# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४७

## सभावृत्तांत

दिनांक - २०.८.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगष्ट-२०१५ ची मासिक मा. महापालिका सभा गुरुवार दि.२०.८.२०१५ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बाबर शारदा प्रकाश
१९. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
२०. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२१. मा.उल्हास शेट्टी

२२. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२३. मा.पवार संगीता शाम

२४. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३४. मा.राजू मिसाळ

३५. मा.नंदा विकास ताकवणे

३६. मा.नेटके सुमन राजेंद्र

३७. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३८. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४०. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

४१. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४२. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४३. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४४. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४५. मा.अपर्णा निलेश डोके

४६. मा.अनंत सुभाष को-हाळे

४७. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४८. मा.जयश्री वसंत गावडे

४९. मा.पवार मनीषा काळूराम

५०. मा.प्रसाद शेट्टी

५१. मा.अविनाश (दादा) टेकावडे

५२. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५५. मा.वाबळे संजय मल्हारराव

५६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५८. मा.सुपे आशा रविंद्र

५९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

६०. मा.मोहिनीताई विलास लांडे

६१. मा.अजित दामोदर गव्हाणे

६२. मा.गोफणे अनुराधा देविदास

६३. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६५. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६६. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६७. मा.लोंढे शुभांगी संतोष

६८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६९. मा.ननवरे जितेंद्र बाबा

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८०. मा.टाक अरुण मदन

८१. मा.वाघेरे सुनिता राजेश

८२. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

९४. मा.बारणे माया संतोष

९५. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९८. मा.कलाटे स्वाती मयुर

९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१००. मा.चौंधे आरती सुरेश

१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल

१०५. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०७. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११०. मा.जम सोनाली पोपट

१११. मा.प्रशांत शितोळे

११२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११४. मा.गायकवाड संध्या सुरदास

११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११६. मा.शेंडगे आशा सुखदेव

११७. मा.मोटे किरण बाळासाहेब

११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११९. मा.संजय केशवराव काटे

१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१२२. मा.पाटील सुजित वसंत

१२३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.दुधेकर, मा.निकम, मा.पठाण, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.शेख - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, पंजाबमध्ये दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेले जवान तसेच डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम - भारतरत्न माजी राष्ट्रपती, सुब्रा मुखर्जी - मा.राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या पत्नी, दादासाहेब उर्फ रा.सू.गवई-माजी राज्यपाल, भालचंद्र पेंढारकर - नटश्रेष्ठ, भीमराव पाटोळे - माजी नगरसेवक व माजी सैनिक, सखूबाई बाळू धराडे - मा.महापौर सौ.शकुंतला धराडे यांच्या सासूबाई, दिनकर तुकाराम कांबळे - कार्यकारी अभियंता संजय

कांबळे यांचे वडील, नारायण गणपत गायकवाड - नगरसचिव विभागातील शिपाई विनोद नारायण गायकवाड यांचे वडील, अनुसया गोविंदराव आल्हाट मोशी, कु.करुणा हरेश परमार, नारायण बवले, भोसरी, बदामबाई चंद्रकांत लोंढे, नामदेव रोमळे - ज्येष्ठ नागरिक, रखमाबाई नारायण नखाते, मुरलीधर कंक, पी.एस.कांबळे व जितेंद्र कांबळे, सांगवी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.वसंत लोंढे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, आजची सभा मंगळवार दि.२५/८/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** सन्मा.सदस्यांचे सूचनेप्रमाणे गुरुवार दि.२५/८/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ४७</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.२०/८/२०१५ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - २५.८.२०१५</u> <u>वेळ - दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे ऑगष्ट-२०१५ ची) गुरुवार दि.२०/८/२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२५/८/२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

५. मा.भालेकर अरुणा दिलीप

६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

८. मा.सायकर अजय शंकरराव

९. मा.जाधव साधना रामदास

१०. मा.जाधव राहुल गुलाब

११. मा.आल्हाट मंदा उत्तम

१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१३. मा.काळजे नितीन प्रताप

१४. मा.जगदीश शेट्टी

१५. मा.बाबर शारदा प्रकाश

१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१८. मा.उल्हास शेट्टी

१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२६. मा.भारती फरांदे

२७. मा.आर.एस.कुमार

२८. मा.जावेद रमजान शेख

२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३९. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४०. मा.लोंढे गणेश नारायण

४१. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४२. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५१. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५२. मा.सुपे आशा रविंद्र

५३. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५४. मा.मोहिनीताई विलास लांडे

५५. मा.अजित दामोदर गव्हाणे

५६. मा.गोफणे अनुराधा देविदास

५७. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

५८. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

५९. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६०. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६१. मा.लोंढे शुभांगी संतोष

६२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६३. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६५. मा.पालांडे सुजाता सुनिल

६६. मा.बहल योगेश मंगलसेन

६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६८. मा.कदम सदगुरु महादेव

६९. मा.गिता सुशील मंचरकर

७०. मा.कैलास महादेव कदम

७१. मा.छाया जगन्नाथ साबळे

७२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७३. मा.टाक अरुण मदन

७४. मा.आसवाणी सविता धनराज

७५. मा.वाघेरे सुनिता राजेश

७६. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७९. मा.काळे विमल रमेश

८०. मा.पाडाळे निता विलास

८१. मा.विनोद जयवंत नढे

८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८४. मा.विमलताई सुरेश जगताप

८५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८६. मा.बारणे निलेश हिरामण

८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८. मा.बारणे माया संतोष

८९. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९०. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९१. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९२. मा.कलाटे स्वाती मयुर

९३. मा.चौंधे आरती सुरेश

९४. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९५. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९६. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९७. मा.जवळकर वैशाली राहुल

९८. मा.जगताप राजेंद्र गणपत

९९. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१००. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०१. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०२. मा.प्रशांत शितोळे

१०३. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०४. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०५. मा.गायकवाड संध्या सुरदास

१०६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०७. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०८. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११०. मा.संजय केशवराव काटे

१११. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११२. मा.पाटील सुजित वसंत

११३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडुसकर, मा.गायकवाड, मा.माने, मा.खांडकेकर, मा.दंडवते, मा.माछरे, मा.खोसे - सहा.आयुक्त, मा.लावंड - कायदा अधिकारी, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.दुधेकर, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.कांबळे, मा.गद्रूवार, मा.शेख - कार्यकारी अभियंता, मा.बोदडे, मा.बेंडे - प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.महापालिका सभा क्रमांक - ४५ दिनांक २०/०६/२०१५ (दु.२.०० व दु.४.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-----------

**नियुक्त्या**

**विषय क्रमांक - १**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या
नेमणे :-

(१) विधी समिती -

(टिप - विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(२) महिला व बालकल्याण समिती -

अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

(३) शहर सुधारणा समिती

(टिप - शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

(४) क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

(टिप - क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.)

**मा.नगरसचिव** - विषय क्रमांक १ - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे ४ (चार) विशेष समित्या नेमणे. विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.

(१) विधी समिती - विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

विधी समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२१, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ इतर-०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने विधी समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत विधी समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये

वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.आर.एस.कुमार, २) मा.नंदा विकास ताकवणे, ३) मा.पांढरकर निलेश शंकरराव, ४) मा.भारती फरांदे, ५) मा.पाडाळे निता विलास, ६) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम, ७) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव, ८) मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ, ९) मा.चारुशीला प्रभाकर कुटे या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

**<u>मा.नगरसचिव</u>** - (२) महिला व बालकल्याण समिती -

(अ)महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

[महिला व बालकल्याण समितीवर २ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - २१, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना - ०४, भारतीय जनता पक्ष - ०३ इतर-०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ०१, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-०१, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.गोफणे अनुराधा देविदास व २) मा.जवळकर वैशाली राहुल या पालिका सदस्यांच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहिर करण्यात आले.)

**<u>मा.नगरसचिव -</u>** (२) (ब) महिला व बाल कल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

[महिला व बालकल्याण समितीवर ७ महिला सदस्यांचे नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - २१, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना - ०४, भारतीय जनता पक्ष - ०३ इतर-०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने महिला व बालकल्याण समितीवर नामनिर्देशित करावयाच्या महिला सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी - ०५, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी - ०१, शिवसेना व आर.पी.आय.महायुती (आघाडी) - ०१ याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर महिला सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.नेटके सुमन राजेंद्र २) मा.शितोळे शैलजा बाबुराव, ३) मा.श्रध्दा बाजीराव लांडे, ४) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर, ५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे, ६) मा.गिता सुशिल मंचरकर, ७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडून जाहिर करण्यात आले.)

**<u>मा.नगरसचिव</u>** - (३) शहर सुधारणा समिती -

शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[शहर सुधारणा समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२१, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३

इतर-०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने शहर सुधारणा समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १, याप्रमाणात असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी महानगरपालिकेतील त्यांच्या पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत शहर सुधारणा समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद, २) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे, ३) मा.जाधव साधना रामदास, ४) मा.पालांडे सुजाता सुनिल, ५) मा.सौ.स्वाती प्रमोद साने, ६) मा.पाटील सुजित वसंत, ७) मा.चौंधे आरती सुरेश, ८) मा.भालेकर अरुणा दिलीप, ९) मा.बारणे निलेश हिरामण या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

**<u>मा.नगरसचिव</u>** - (४) क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती -

क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ०९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत.

[क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ पालिका सदस्यांचे सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशन करणेकामी महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-८४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२१, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी)-१५, महाराष्ट्र नवनिर्माण सेना-०४, भारतीय जनता पक्ष-०३ इतर-०१ याप्रमाणे असणारे पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळाप्रमाणे त्यांच्यावतीने क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांची संख्या राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी-०६, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित (अपक्ष) आघाडी-२, शिवसेना व आर.पी.आय. महायुती (आघाडी) - १, याप्रमाणात

असल्याचे महानगरपालिकेने विचारात घेवुन आणि महानगरपालिकेतील सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/ पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांनी पक्षाच्या/गटाच्या तौलानीक संख्याबळाच्या प्रमाणात त्यांच्यामार्फत क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर पालिका सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी मा.महापौर यांजकडे सभेच्या वेळी पाठविलेल्या नावांचे बंद लखोटे मूळच्याच अवस्थेत असुन ते पुर्वी उघडलेले नाहीत याची उपस्थितांना खात्री करण्यासाठी बंद लखोटे सभेपुढे दाखविणेत आल्यानंतर सदर बंद लखोटे टेबलावर ठेवुन ते मा.महापौर यांनी क्रमाने सर्वांच्या समोर उघडुन प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर त्यातील नावे सभेत उपस्थित श्री.बोदडे यांचेमार्फत सभेमध्ये वाचून दाखविण्यात आल्यानंतर सभेत वाचण्यात आलेल्या नावांबद्दल ज्या गटनेत्याकडून ही नावे आली होती त्यांचे काही आक्षेप नसल्याने त्याप्रमाणे पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.जावेद रमजान शेख, २) मा.ओव्हाळ शेखर अशोक, ३) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ४) मा.जगदीश शेट्टी, ५) मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे, ६) मा.बो-हाडे अरुण तुकाराम, ७) मा.आसवाणी सविता धनराज, ८) मा.मासुळकर समीर मोरेश्वर, ९) मा.पवार संगीता शाम या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे मा.महापौर यांजकडुन जाहीर करण्यात आले.]

ठराव क्रमांक - ७३१ विषय क्रमांक - १
दिनांक - २५/८/२०१५ विभाग - नगरसचिव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ. चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र. ६७ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे १) मा.विधी समिती, २) मा.महिला व बालकल्याण समिती, ३) मा.शहर सुधारणा समिती, ४) मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती या ४ (चार) विशेष समित्या नेमण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच

१) **<u>मा.विधी समिती</u>** - मा.विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.आर.एस.कुमार, २) मा.नंदा विकास ताकवणे, ३) मा.पांढरकर निलेश शंकरराव, ४) मा.भारती फरांदे, ५) मा.पाडाळे निता विलास, ६) मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम, ७) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव, ८) मा.म्हेत्रे

सुरेश रंगनाथ, ९) मा.चारुशीला प्रभाकर कुटे या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच -

२) **<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>** - अ) मा.महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.गोफणे अनुराधा देविदास व २) मा.जवळकर वैशाली राहुल या पालिका सदस्यांच्या व (ब) महिला व बाल कल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.नेटके सुमन राजेंद्र २) मा.शितोळे शैलजा बाबुराव, ३) मा.श्रध्दा बाजीराव लांडे, ४) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर, ५) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे, ६) मा.गिता सुशिल मंचरकर, ७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील या पालिका महिला सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच -

**३) <u>मा.शहर सुधारणा समिती</u>** - मा.शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद, २) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे, ३) मा.जाधव साधना रामदास, ४) मा.पालांडे सुजाता सुनिल, ५) मा.सौ.स्वाती प्रमोद साने, ६) मा.पाटील सुजित वसंत, ७) मा.चौंधे आरती सुरेश, ८) मा.भालेकर अरुणा दिलीप, ९) मा.बारणे निलेश हिरामण या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे. तसेच -

४) **<u>मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>** - मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.जावेद रमजान शेख, २) मा.ओव्हाळ शेखर अशोक, ३) मा.ननवरे जितेंद्र बाबा, ४) मा.जगदीश शेट्टी, ५) मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे, ६) मा.बो-हाडे अरुण तुकाराम, ७) मा.आसवाणी सविता धनराज, ८) मा.मासुळकर समीर मोरेश्वर, ९) मा.पवार संगीता शाम या पालिका सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माक्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**मा.माया बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर एकीकडे आपण बेस्ट सिटीचे स्वप्न पाहतो आणि दुसरीकडे या शहरामध्ये डुकरं, कुत्री आणि मोकाट जनावर यांच जे साम्राज्य पसरलेले आहे यांच्याकड प्रशासनाच बिलकुलही लक्ष नाही. या गोष्टींसाठी आम्ही वारंवार अधिका-याकडे तक्रारी केल्यातरी त्याची कोणीही दक्षता घेत नाही. डॉ.गोरे यांना पंधरा दिवसापुर्वी मी विनंती केली होती की या संपुर्ण शहरात डुकर कुत्री आणि मोकाट जनावर किती याची माहिती दयावी. पंधरा दिवसात त्यांनी मला फक्त एकच पेपर दिलेला आहे त्यात फक्त कुत्र्याची माहिती दिलेली आहे बाकीची माहिती त्यांच्याकडे बिलकुलही अव्हेलेबल नाही आणि प्रत्येक वेळी मला उत्तर मिळते की क्लार्क जागेवर नाही, ते आज इकडे गेले, तीकडे गेले. आमच्या सारख्या नगरसेवकांची जर ही परिस्थिती आहे तर सर्वसामान्य नागरीकांनी दाद मागायची कोणाकडं. याची जी माहिती दिलेली आहे ती तुम्हांला सांगते. २००६-०७ साली मे.महाराष्ट्र टेक कॉर्पोरेटर ऑफ ऍग्रीकल्चर या संस्थेला त्यांनी ठेका दिलेला होता त्याची तरतूद केली ती आठ लाखाची केली व खर्च केला ७,७५,७२०/- आणि कुत्र्यावरती शस्त्रक्रीया १८०४ केल्या. २००७-०८ ला तरतूद केली साडे आठ लाख खर्च केला ६,१९,२००/- आणि शास्त्रक्रीया १४४० केल्या. २००९ ला ८ लाखाची तरतूद व ६ लाखाचा खर्च केला व शस्त्रक्रीया १४४० केल्या. २०१० ते २०१३ एकाच संस्थेला ठेका दिलेला आहे, पशुकल्याण संस्था, पद्मजी मिल. १५ लाखाची तरतूद केली होती आणि खर्च केला ७,८४,२४५ व शस्त्रक्रीया २०३७ केल्या. एकाच संस्थेला तीन तीन वर्षे आपण टेंडर दिलेली आहेत. सोसायटी फॉर ऍनिमल प्रोटेक्शन, कोल्हापुर आणि पिंपल फॉर ऍनिमल, पुणे या दोन्ही संस्थेला आपण तीन वर्षे झाले काम देतोय पण यांच काम अतीशय घाणेरड प्रकारच आहे. अक्षरश: नागरीक वैतागलेले आहेत आणि येथे सभागृहात बसलेले १२८ नगरसेवक सुध्दा यामुळे त्रस्त आहेत.

प्रत्येक कमिटीमध्ये डॉ.गोरे यांचा विषय येतो एकही नगरसेवक त्यांच्या कामाबद्दल समाधानी नाही. जर असे प्रशासनाचे काम असेलतर स्मार्ट सिटी आपल्याला विसरावीच लागेल. डॉ.गोरे यांनी स्टेजवर येवून याची संपुर्ण माहिती दयावी. शहरात २००५ पासून किती कुत्री पकडलेली आहेत व किती मोकाट जनावर पकडली याची संपुर्ण माहिती सभागृहाला आता दयावी.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता मायाताई बारणे यांनी विषय मांडलेला आहे. सत्य परिस्थिती त्यांनी मांडलेली आहे परंतु तो विषय पुढे आहे. विषयानुसार चालूयात. विषय क्रमांक १ घ्यावा व तो विषय आल्यानंतर त्यांची माहिती त्यावेळेला दयावी व त्याच उत्तरही त्यावेळेला दयाव आता विषय पत्रीकेवरील विषय चालू करावेत.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७३२ विषय क्रमांक - २

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. क्रीडा/८/कावि/४५/१५ दि.२५/५/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२०२० दि.२१/७/२०१५

मा.क्रिडा समिती सभा ठ.क्र.१०९ दि.१५/७/२०१५ नुसार, मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/०१/२०१४ अन्वये क्रीडा धोरण पा.क्र.१४ वरील क्रीडा विभागाकडील धोरण नियमावली भाग क्र.०१ ड शिष्यवृत्ती व आर्थिक मदतीकरिता नियम क्रमांक०३. आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे नुसार मन.पा. परिसरातील जे खेळाडू एशियन, राष्ट्रकुल कॉमनवेल्थ ऑलिम्पिक अशा नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होतात. अशा खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त र.रू.१,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. अशी महापालिका क्रीडा धोरणामध्ये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच क्रीडा धोरण, भाग क्र.१ - फ - क्रीडा प्रशिक्षण केंद्र - यामध्ये अ.क्र.०२ साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देणे यात भाग-३ - इतर अँडव्हेंचर स्पोर्ट्स - स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक असे वर्गीकरण करून ज्या इव्हेंटच्या स्पर्धा घेणे शक्य आहे, त्यांच्या स्पर्धा घेऊन इतर इव्हेंटचे प्रात्याक्षिक दाखविण्याचा प्रयत्न व्हावा. यामुळे या खेळांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळेल. तसेच प्रशिक्षण राबविणे, साहसी सप्ताह भरविणे व साहसी क्रीडा प्रकारांना पुरस्कार देण्यात यावेत. मोहिमांसाठी आर्थिक मदत तसेच साहित्य खरेदी व इतर बाबींसाठी आर्थिक मदत करण्यात यावी. भविष्यात विचार करण्यात येईल. असे नमूद केलेले आहे.

परंतु क्रीडा धोरणामध्ये, म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतचे नियम व अटी निश्चित केलेले नाहीत. म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेप्रमाणे नियम व अटी निश्चित करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७३३ विषय क्रमांक - ३

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. क्रीडा/८/कावि/५६/१५ दि.०३/०६/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२०२१ दि.२१/७/२०१५

मा.क्रिडा समिती सभा ठ.क्र.११० दि.१५/७/२०१५ नुसार, श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांची दि. १८/०५/२०१५ ते ०५/०६/२०१५ या कालावधीमध्ये माऊंट गंगोत्री ३, (उंची ६,५५७ मी.उंच) येथील गिर्यारोहण मोहिमे करिता निवड करणेत आलेली असलेने, सदर मोहिमेकरिता इंडियन माऊंटनेरिंग फेडरेशन, दिल्ली व सदर मोहिमेकरिता इंडियन माऊंटनेरिंग फेडरेशन, दिल्ली यांची मान्यता घेतलेली असून, **3 Point Adventure, Uttarakhand** ही संस्था या मोहिमेची सुत्रे व जबाब्दारी स्वीकारत असून, या संस्थेमार्फत ही मोहिम पार पाडणे करिता र.रू.१,५०,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख पन्नास हजार फक्त) इतके आर्थिक सहाय्य मिळणेबाबत मागणी केली आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/०१/२०१४ अन्वये क्रीडा धोरण पा.क्र.१४ वरील क्रीडा विभागाकडील धोरण नियमावली भाग क्र.०१ ड शिष्यवृत्ती व आर्थिक मदतीकरिता नियम क्रमांक-०३. आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे नुसार म.न.पा. परिसरातील जे खेळाडू एशियन, राष्ट्रकुल कॉमनवेल्थ ऑ लिम्पिक अशा नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होतात. अशा खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त र.रू.१,००,०००/-

पर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. अशी महापालिका क्रीडा धोरणामध्ये मान्यता देण्यात आलेली आहे.

निमंत्रित स्पर्धेसाठी जाणा-या आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी सदर आर्थिक सहाय्य देय राहणार नाही. महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार अथवा पिंपरी चिंचवड मन.पा. यापैकी एकाच प्राधिकृत संस्थेकडून स्पर्धा प्रवास निवास, भोजन खर्च देय राहिल. तसेच लेखी पत्र संबंधित राज्य,राष्ट्रीय क्रीडा संघटनेकडून देणे बंधनकारक राहिल. अशी महापालिका सभेने क्रीडा धोरणास मान्यता दिलेली आहे.

पिंपरी चिंचवड मन.पा. क्रीडा धोरण, भाग क्र.१ - फ - क्रीडा प्रशिक्षण केंद्र - यामध्ये अ.क्र.०२ साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देणे यात भाग-३ - इतर अँडव्हेंचर स्पोर्ट्स - स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक असे वर्गीकरण करून ज्या इव्हेंटच्या स्पर्धा घेणे शक्य आहे, त्यांच्या स्पर्धा घेऊन इतर इव्हेंटचे प्रात्याक्षिक दाखविण्याचा प्रयत्न व्हावा. यामुळे या खेळांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळेल. तसेच प्रशिक्षण राबविणे, साहसी सप्ताह भरविणे व साहसी क्रीडा प्रकारांना पुरस्कार देण्यात यावेत. मोहिमांसाठी आर्थिक मदत तसेच साहित्य खरेदी व इतर बाबींसाठी आर्थिक मदत करण्यात यावी. भविष्यात विचार करण्यात येईल. असे नमूद केलेले आहे.

परंतु म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित केलेल्या नाहीत. याबाबत मा.आयुक्त यांची मा.महापौर यांचेशी दि.१२/५/२०१५ रोजी समक्ष चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये मा.आयुक्त यांनी क्रीडा धोरणामध्ये म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित करणेस, मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य अदा करण्यात यावे, असे ठरले होते.

त्यानुसार तातडीची बाब म्हणून मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. क्रीडा/३/कावि/२०१५ दि.१३/५/२०१५ अन्वये श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य र.रू.१,००,०००/-,(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) **3 Point Adventure Agency** यांचे नावे धनादेशाव्दारे आर्थिक सहाय्य अदा करण्यात आलेले आहे.

क्रीडा धोरणामध्ये म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा. अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित करणेस, मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/३/कावि/२०१५ दि.१३/५/२०१५ अन्वये श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक

विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य र.रू.१,००,०००/-,(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) **<u>3 Point Adventure Agency</u>** यांचे नावे धनादेशाव्दारे अदा केल्याने यास मा.क्रीडा समिती सभेमार्फत मा.स्थायी समिती सभा व मा.महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब क्रीडा धोरणामध्ये म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित करणेस, मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/३/कावि/२०१५ दि.१३/५/२०१५ अन्वये श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य र.रू.१,००,०००/-,(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) **<u>3 Point Adventure Agency</u>** यांचे नावे धनादेशाव्दारे अदा केल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/८४/२०१५ दि.२३/०७/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२०८५ दि.४/८/२०१५

माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात जमा बाजूला असे कोणतेही लेखाशिर्ष नसल्याने सदरची खाजगी मान्यताप्राप्त विदयालयाकडील विदयार्थ्यांकडुन **२५ टक्के** रक्कम जमा करण्याबाबत नव्याने लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात जमा बाजूला **<u>खाजगी विदयार्थी बसपास २५ टक्के रक्कम जमा</u>** हे लेखाशिर्ष नव्याने निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात काही तातडीचे व अत्यावश्यक कामांचा समावेश करावा लागणार याकामी फक्त तरतुद वर्गीकरण करावे लागणार आहे.

१) खालील कामा मधून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| **अ. क्र.** | **कामाचे नाव** | **लेखाशिर्ष** | **पान क्रं.** | **अ. क्र.** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **सन २०१५-१६ ची तरतुद लाख** | **वर्गीकरण र.रु.तरतुद** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील आरक्षण क्र.जी.पी.१३२ (बस टर्मिनस) विकसित करणे. | विशेष योजना | ५७ | ४० | १२००००००० | ८५०००००० | ४००००००० |

२) खालील कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

| **अ. क्र.** | **कामाचे नाव** | **लेखाशिर्ष** | **पान क्रं.** | **अ. क्र.** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **सन २०१५-१६ ची तरतुद लाख** | **वर्गीकरण र.रु.तरतुद** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | संभाजीनगर शाहूनगर येथे स्थापत्य विषयक कामातील उर्वरित कामे करणे. | विशेष योजना | नविन काम/विदयुत विभाग | | ७,००,००,००० (७ कोटी) | ०.०० | ३,५०,००,००० (३ कोटी ५० लाख) |
| ३ | प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथील स्केटींग ग्राऊंड मध्ये आच्छादन करणे व शाळेय सुविधा निर्माण करणे. | २४) शाळा मैदाने आणि क्रिडा संकुल उभारणे व दुरुस्ती करणे | नविन काम स्थापत्य विशेष योजना | | १०००००००० (१ कोटी) | ०.०० | ५०००००० (५० लाख) |
| ४ | प्रभाग क्र. २८ W-Sector ते टेल्को कंपनी सिमाभिंती लगत रस्ता विकसीत करणे. | ९) रोड पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टीम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत | नविन काम स्थापत्य विशेष योजना | | २०००००००० (२ कोटी) | ०.०० | ५०००००० (५० लाख) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कामे करणे | | | | |

तसेच सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील खालील कामामध्ये नव्याने बदल करणेत आलेला आहे.

| **अ. क्र.** | **कामाचे नाव** | **पान क्रं.** | **अ. क्र.** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **सन २०१५-१६ ची तरतुद लाख** | **वर्गीकरण र.रु.तरतुद** |
|---|---|---|---|---|---|---|
| **खालील कामाचा अंदाजपत्रकात समाविष्ट आहे या मधून तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.** | | | | | | |
| १ | पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील आरक्षण क्र. ३०१ येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा भव्य पुतळा उभारणे व सहल केंद्र पर्यटन स्थळ | ५८ | ६२ | ४०००००००० (४० कोटी) | ५०००००००  (५ कोटी) | २०००००००  (२ कोटी) |
| **खालील कामाचा अंदाजपत्रकात समावेश करण्यास तसेच वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.** | | | | | | |
| २ | प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथे बर्ड व्हॅली येथे लेसर शो साठी आवश्यक कामे करणे. | नविन काम/ विदयुत विषयक | | १०००००००० (१० कोटी) | ०.०० | ३०००००००  (३ कोटी) |
| | एकूण | | | | ५०००००००  (५ कोटी) | ५०००००००  (५ कोटी) |

तसेच संभाजीनगर प्र.क्र.९ मध्ये उर्वरीत दिव्यांचे नुतनीकरण करणे, तसेच विदयुतविषयक कामे करणे या कामाचा सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात समावेश नाही. परंतु सदर काम करणे आवश्यक असल्याने, सदर कामाचा समावेश सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात करुन अंदाजपत्रकातील पानांक ५७ अ.क्र. ४० येथील प्र.क्र.९ संभाजीनगर येथील आरक्षण क्र. जी.पी.१३२ ( बस टर्मिनस विकसित करणे ) हया कामावरिल र.रु. ९ कोटीमधुन र.रु. ५ कोटी सदर कामाकरीता वर्गीकरण करुन स्थापत्य विभागाकडील प्रकल्पाअंतर्गत अंदाजपत्रक २०१५-१६ मधील पान क्र. ५६ अ.क्र.४ या कामाअंतर्गत नव्याने निविदा काढून सदर काम करुन घेणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- प्रभाग क्रमांक ५७ पिंपळ गुरव मध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाचे ताब्यात आलेल्या रस्त्यांचे खडी मुरुम व बीबीएम करणेकामी निविदा नोटीस क्रमांक ३/६७-२०१४-१५ चे कामास रक्कम रु. ९८,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामास वाढीव र.रु. ८३,७५,०००/- (एकूण ऱ्याऐंशी लाख पंच्याहत्तर हजार फक्त) ची आवश्यकता आहे. म.न.पा. चे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकांतील पथ-खडी मुरुमाचे रस्ते या लेखाशीर्षावरील पान क्रमांक २०० अ.क्र.३० वर नमूद केलेल्या कामावर पुरेशी तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. तरी म.न.पा.चे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकांतील पान क्र.५९३ अ.क्र.१ वर रक्कम रु. २४१.१४ कोटी तरतूद असून त्यामधुन पथ खडी मुरुमाचे रस्ते या लेखाशीर्षावरील पान क्र. २०० अ.क्र. ३० या लेखाशीर्षावरील कामासाठी रक्कम रु. ८३,७५,०००/- या रकमेच्या तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. तसेच कासारवाडी प्रभाग क्र. ६३ मधील खाली नमुद केलेल्या विकास कामांना अपुरी तरतुद असल्यामुळे सदर कामांवर तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे तरी सदर कामांवर खालीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अनु क्र. | मुळ तरतुद | | | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंदाजपत्रकीय रक्कम | सन२०१५-१६ ची तरतुद | सन २०१५-१६ ची आवश्यक तरतूद | | |
| २ | प्र.क्र.६३ कासारवाडी येथील स्मशानभूमीचे नूतनीकरण करणे. | विशेष योजना | २६ | १३५ | १०००००००० | ८००००० | ७०००००० | ६२००००० | ० |
| ३ | प्र.क्र.६३ कासारवाडी येथे काँक्रीट रस्ते करणे | विशेष योजना | २६ | १३८ | ३०००००००० | ६००००० | ३००००००० | २९४००००० | ० |
| ४ | प्र.क्र.६३ मध्ये ध्यानकेंद्र, स्केटिंग ग्राऊंड व व्हालीबॉल ग्राऊंड तयार करणे. | विशेष योजना | ५४ | ३० | १०००००००० | ६००००० | ३०००००० | २४००००० | ० |
| ५ | प्र.क्र.६३ कासारवाडी आरक्षण क्र. २२ | विशेष योजना | ५१ | ३१ | २००००००० | १०००००० | ७०००००० | ६०००००० | ० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | येथे मैदान तयार करणे. | | | | | | | | |
| ६ | पाणीपुरवठा टप्पा १ जे.एन..यु.आर. एम.<br>पवना धरणापासून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे. | पाणीपुरवठा टप्पा १ जे.एन. एन.यु. आर.एम.अंतर्गत करावयाची कामे | ५९३ | १ | ३३१११००००० | २४११४००००० | २३६७४००००० | | ४४०००००० |
| | | | | | | २४१४४००००० | २४१४४००००० | ४४०००००० | ४४०००००० |

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय विदयुत कार्यालयाची स्थापना प्रभाग पुनरचनेअंतर्गत २६/१/२०१३ रोजी झाली आहे परंतु विदयुत कामकाजासाठी अत्यावश्यक तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी वर्ग अपुरा मिळाला असल्याने कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. याबाबत प्रभाग समिती बैठकांमध्ये वारंवार चर्चा झाली असून प्रशासन विभागात मागणी करुन देखील आज अखेर आवश्यक कर्मचारी वर्ग नियुक्त होऊ शकलेला नाही. त्यामुळे नागरीकांची दिवाबत्तीबाबत होणारी गैरसोय टाळण्यासाठी “स्ट्रिटलाईट देखभाल दुरुस्ती व चालनाचे कामकाज” स्वतंत्र निविदा मागवून ठेका पध्दतीने दिल्यास गैरसोय दुर होणार आहे. तरी फ क्षेत्रीय कार्यालयाकरीता स्ट्रिटलाईट देखभाल दुरुस्ती व चालनाचे कामकाज करणेकरीता निविदा पध्दतीने कामकाज करुन घेण्यासाठी सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात स्वतंत्र लेखाशिर्षक निर्माण करुन त्यावर महसुली अंदाजपत्रकातील पानांक ९६ अ.क्र.५ येथील स्ट्रिटलाईट विजबिले या लेखाशिर्षावरुन तरतुद रक्कम रुपये २४ कोटीतून रक्कम रुपये ५० लाख रक्कम वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषया संदर्भात माझे काही ऑब्जेक्शन नाही. उपसूचनेसह विषय पास करण्यास हरकत नाही. पण शिक्षणमंडळाचे आडीच महिने उलटून सुध्दा आतापर्यंत साहित्य काहीही दिलेले नाही. नोटबुक, बुट वगैरे काही वाटप झालेले नाही. पहिले टेंडर काढले ते रिजेक्ट केले ते का केले माहिती

नाही त्याचे कारण सभागृहामध्ये सांगण्यात यावं. इमर्जन्सी मॅटर आहे. मुलांना नोटबुक नाही, पुस्तक नाहीत, परत टेंडर काढले. त्या अगोदर मुलेपनी असा रिमार्क मारला होता की ब्रॅण्ड नेम टाकून टेंडर काढू नका तरीही दुसरे टेंडर ब्रॅण्ड नेम टाकूनच काढले गेले आहे. त्या टेंडरलाही हायकोर्टात स्टे आला आहे असं मला समजतं. माझ्या माहितीनुसार मंत्रालयाने हे सर्व अधिकार आयुक्तांना दिलेले आहेत. हे पत्र २८ ऑक्टोबरला महानगरपालिकेला पाठवलेले आहे. ते पत्र वाचून दाखवतो. त्यामध्ये शिक्षण मंडळाला प्रधान करण्यात आलेले सर्व अधिकार आपोआप संपुष्टात आलेले आहेत याचा अर्थ काय की शिक्षणमंडळाचे अधिकार संपुष्टात आलेले आहेत परंतु हे सर्व अधिकार आयुक्तांना दिलेले आहेत याचेच उदाहरण सांगतो, पुणे महापालिकेमध्ये शिक्षणमंडळाने टेंडर काढले त्यामध्ये आहे की त्यासंदर्भात निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पुणे मनपाला असतील. मग आपल्या महापालिकेत टेंडर काढताना शिक्षणमंडळाला अधिकार आहेत असे कसे काय म्हणलेले आहे. आयुक्तांना अधिकार आहेत. शिक्षणमंडळाला फायनानशिअल अधिकार नाहीत ते आयुक्तांना आलेले आहेत. याबद्दल स्पष्टीकरण पाहिजेत. टेंडर जे काढलेले होते ते साहित्य वाटप केलेले आहे का. यापुढे रिटेंडर कधी काढणार मुलांना पुस्तक, वहया, बॅग हे कधी वाटप करणार याची माहिती दयावी. आयुक्तांनी हे सांगावे की अशा पॉवर आपल्याकडे आलेल्या नाहीत का माझ्याकडे मंत्रालयाचे पत्र आहे त्यामुळे याबाबतीत स्पष्टीकरण देण्यात यावे ही विनंती.

**मा.अनंत को-हाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व अधिकारी वर्ग आणि पत्रकार मित्र. या विषयाला अनुसरुन मला काही गोष्टी तुम्हांला सांगायच्या आहेत की आपल्या शाळेची परिस्थिती अतीशय दयनीय आहे. केशवनगर शाळेमध्ये मराठी आणि हिंदी या विषयाला शिक्षक नाहीत. दळवीनगर या शाळेत सुध्दा शिक्षकांची कमतरता आहे. अशी परिस्थिती महापालिकेच्या ज्या ज्या शाळा आहेत त्या शाळेमध्ये आहे. आपण शाळेतील विदयार्थ्यांवर एवढा खर्च करतो परंतु जर त्यांना शिकविण्यासाठी शिक्षकच नसतीलतर निश्चितपणे या गोष्टीकडे आपण लक्ष दिले पाहिजे. आपण जर या शाळेमध्ये शिक्षण देवू शकत नसालतर, त्यांना शिक्षक देवू शकत नसालतर निश्चितपणे आपण हा एवढा मोठा खर्च करतो आणि या विदयार्थ्यांना शिक्षणापासून वंचीत ठेवू शकत नाहीत. शिक्षकांना इलेक्शन डयुटी सुध्दा दिलेल्या आहेत, महापालिकेच्या शाळेमध्ये विदयार्थी येणार ते गरीब घरातून आलेले असतात. त्यांना शिक्षणाचा अधिकार आहे. आपण त्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी घेतलेली आहे परंतु ती जबाबदारी फक्त कागदावरच आहे. प्रत्यक्षात काही गोष्टी घडत नाहीत. भरपूर शिक्षक, भरपूर पालक माझ्या घरी रोज येतात. प्रिन्सीपल नाही, शिक्षक नाही असे सांगतात. मा.महापौर साहेब, मी मागे आपल्याला बोललो होतो. आपल्याला महापालिकेच्या शाळेतील शिक्षण सुधारावयाचे असेलतर तुम्ही नवीन जीआर काढा, मंजुर करुन घ्या की सर्व नगरसेवकांची मुलं, सर्व अधिका-यांची मुलं हे फक्त सरकारी शाळेत शिकतील. जबाबदारी

घ्यायचीतर पुर्ण घ्या. नावाला जाबाबदारी घेवून विदयार्थ्यांचे नुकसान करु नका. गरीबांना शिकण्याचा अधिकार आहे या गोष्टीकडे आपण लक्ष दिले पाहिजे. उबाळे मॅडमकडे आम्ही वेळोवेळी शिक्षकांच्या बाबतीत तक्रारी घेवून वेळोवेळी येतोत, तरी पुरेशा शिक्षकांचा पुरवठा करावा व या विषयाकडे आपण लक्ष घालावे आणि सर्व विदयार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करावी.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी वर्ग. विषय क्रमांक ४ हा माध्यमिक शाळेचा विषय आहे. आयुक्त साहेब, शिक्षकांच्या संदर्भात चार पत्र आपल्याला, शिक्षणमंडळाला आणि शिक्षण अधिका-यांकडे दिलेले आहेत. पत्राची तारीख २७/७/२०१४, २०/४/२०१५, १९/७/२०१५, १९/९/२०१४ आहे. आमच्याकडे शाळा क्रमांक ९०,९१ चिखली गावामध्ये शाळेची पटसंख्या १ ली ते ७ वी ४९४ आहे व दोन टप्प्यामध्ये वर्ग भरले जातात दोन वर्गामध्ये जवळपास १४ वर्ग आहेत व शिक्षक फक्त ११ आहेत. शाळेचा पट एवढा चांगला असेलतर, दोन टप्प्यामध्ये शाळा भरत असेलतर आणि ११ शिक्षक त्यांना देत असालतर १५ वर्ग भरतात तर मला याचे गणीत तुम्ही समजावून सांगीतलेतर बरे होईल. त्या शिक्षकांनी शाळा कशी चालवायची. म्हणजे एका वर्गात दोन बसवायचे का दोन वर्गात एक शिक्षक बसवायचा. शिक्षणदानाचे आपण काम करतो तर त्याच्यामागे नेमका आपला काय उद्देश आहे. एवढा मोठा खर्च करतो, शाळेला सर्व साहित्य देतो. आम्ही विनंती करुन सांगतो की सगळयात चांगला पट आमच्या शाळेचा असताना तुम्ही शिक्षक देत नसाल आणि या पत्राला तुम्ही केराची टोपली दाखवत असालतर मला वाटत नाही यापुढे शाळा चांगल्या चालवल्या जातील. नाहीतर शाळा हॅण्डवर्क करा, एखादया संस्थेला बोलवा. शाळा डोनेट करणारे लोक आहेत. कोणी आपल्याला कॉम्प्युटर देतं, कोणी लॅपटॉप देतं, कोणी बाकीची मदत करतयं. महापालिकेच्या शाळा आपण चालवायच्या नसतीलतर, शिक्षक दयायचे नसतीलतर ती शाळा सुध्दा कोणालातरी चालवायला दयावी. महापालिका सुध्दा उदया कोणालातरी चालवायला दयावी लागेल कारण की आता एलबीटी बंद झाली. या विदयार्थ्याची हालत एवढी वाईट असताना मी अनेकवेळा शिक्षणमंडळाला तक्रारी केलेल्या आहेत. १५ ऑगष्टला आम्ही प्रत्येक शाळेला व्हिजीट देत असताना त्यावेळेस तेथील शिक्षकानी आम्हांला हीच व्यथा मांडलेली आहे. शाळेला शिक्षक नाहीत, आमच्याकडेतर शाळा क्रमांक ९२ ला मुख्याध्यापक पण नाहीत. एवढया आपण सोन्यासारख्या चांगल्या शाळा बांधलेल्या आहेत, विदयार्थी येतात, स्लम ऐरीयामध्ये विदयार्थी येतात, शिक्षण चांगल्या प्रतीचे आहे असे असताना जर आपण शिक्षक देवू शकत नसालतर ही निषेधार्थ बाब आहे. आयुक्त साहेब, आपल्याला विनंती आहे की, उबाळे मॅडम सुध्दा उत्तर काय देतात हे मी तुम्हांला सांगीतलेले आहे. नगरसदस्यांना कसे बोलायचे हे सुध्दा त्यांना कळत नाही मी अनेकवेळा याठिकाणी सुध्दा बोललो आहे, त्यांना विनंती केलेली आहे. हे शिक्षक महापालिकेच्या शाळा चालवितात

त्या शिक्षकांची व्यथा त्यांना माहिती असते. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनेक चांगल्या शाळा आहेत. तिथ सुध्दा आपले विदयार्थी जातात. काही शिक्षकांनी आपला पट कसा वाढेल याचे काम करत असतात, शिक्षण चांगल मिळेल यासाठी ते काम करत असतात जर त्यांना आपण ताकद दिली नाहीतर मला वाटत नाही महापालिकेच्या शाळा चांगल्या राहतील. म्हणून आयुक्त साहेब तुम्हांला विनंती आहे की या विषयात आपण गांभीर्याने लक्ष देवून आम्हांला रिझल्ट मिळाले पाहिजे. आयुक्त साहेब तुम्ही फक्त हो म्हणतात परंतु याच्यावर ॲक्शन घेत नाहीत. मला शाळा क्र. ८९,९०,९१ या शाळाना शिक्षक अपुरे आहेत ते देण्याची व्यवस्था करावी अन्यत: आम्ही शिक्षणमंडळातील सर्व विदयार्थी, शिक्षक याठिकाणी पुढच्या मिटींगला आणून निदर्शन करत बसवू, धन्यवाद.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. हा खाजगी विदयार्थी बसपास २५ टक्के रक्कम जमा हे लेखाशिर्ष यासाठीचा हा विषय आहे. आपण मागच्या महापालिका सभेमध्ये पीएमपीएमएलच्या पासचा हा विषय मंजूर केलेला आहे परंतु त्याच्यावर आजतागायत कुठलीही कारवाई झालेली नाही. आज सकाळीच माझ्याकडे प्राधिकरणामधील जी मतीमंद मुलांची शाळा आहे तिथून पालक आलेले होते. त्यांनी सांगीतले की नागरवस्ती विभागा मध्ये या पासेससाठी त्या मुलांचे फॉर्म भरले जातात परंतु त्याठिकाणी गेल्यानंतर सांगण्यात येते अजून ही योजना सुरु झालेली नाही तरी याचा खुलासा करावा दोन वेळा जीबी तहकूब झाल्यानंतर हा विषय आपण केला. मतीमंद मुल आहेत, एकतर त्या मुलांना शाळेमध्ये आणण्यासाठी आईवडीलांना भरपुर त्रास होतो. खेड, राजगुरुनगर मधुन मुलं त्या शाळेमध्ये येतात, भोसरीमधून येतात, संपुर्ण शहरामधुन मुल त्याठिकाणी येतात असे असताना ती योजना चालू करुन सुध्दा त्यांना आजतागायत पास का दिले नाही. त्यांच्यासाठी ही योजना मोफत आहे, त्या कॅटेगरीमध्ये ते बसतात. या विषयासाठी का वाट बघीतली गेली. दरवर्षी जूनमध्ये शाळा सुरु होतात व जुलैमध्ये आपण ही योजना सुरु करतो आज ऑगष्ट महिना संपण्याची वेळ आलेली आहे तरी याचे उत्तर प्रशासनाने दयावे. याचे उत्तर नागरवस्ती विभागाने दयावे सदर पास का दिलेले नाहीत, कधी देणार आहेत. याला उपसूचना दिलेली आहे. आपण आर्थिक वर्षाचे बजेट मंजूर करतो. त्याच्यावरती दिवसदिवसभर चर्चा करतो. सन्मा.सदस्य आपआपल्या वॉर्डात काय काय पाहिजे त्याच्यावरती सुचना करतात, अभ्यास करतात, अधिकारी अभ्यास करतात आणि ते केलं असताना त्याच्यानंतर लेखाशिर्ष वर्ग स्थायी समितीमध्ये किंवा महापालिका सभेमध्ये होतात त्याच्या बाबतीत कोणीही कोणाशी चर्चा करत नाही. प्रत्येकाला आपल्या वॉर्डातील काम चांगल व्हावे अशी अपेक्षा असते आणि ती असायला पाहिजे. परंतु ते करत असताना दुसऱ्याच्या वॉर्डा मधुन आपण बजेट घेतो का कुठल्या कामातुन घेतो त्याच्यावरुन आपल्या कामात फरक पडणार आहे याची सुध्दा तपासणी झाली पाहिजे. आता सदस्यांनी सांगीतले एलबीटीमुळे ५०० कोटीची तुट आहे. एकीकडे ५०० कोटीची

तूट आहे आणि एकीकडे जर तुम्ही अशाप्रकारची रक्कम वर्ग करणार असालतर प्रत्येकाच भविष्य काय आहे. निवडणूका जवळ आलेल्या आहेत. पुढच्या वर्षी कुठलेही कामकाज करण्यासाठी सभागृहात सदस्य येणार नाहीत आणि असं असताना या वर्षीच कामाची घाई आहे. मा.आयुक्त साहेब, आपल्याला विनंती आहे की अशाप्रकारे वर्गवारीचे जे विषय चाललेले आहेत त्याच्यामध्ये आपण कटाक्षाने लक्ष ठेवावे जेणेकरुन जे मेन्टेनन्सचे काम प्रत्येकाच्या वॉर्डमधली आहेत, प्रभाग समिती असो किंवा कुठलीही समिती असो त्याच्यामध्ये आम्ही मागणी करतो त्यावेळेला सांगीतले जाते की दिडपट्च फक्त टेंडर काढले जाईल. असे असताना कोणावरही अन्याय झाला नाही पाहिजे, धन्यवाद.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी नगरसेवक, पत्रकार बंधुनो. अनेक माझ्या सिनीअर्सनी यावर चर्चा केली. सभागृहात अनेकवेळा या विषयावर चर्चा झालेली आहे, पण महापौर साहेब, आपण त्या उद्देशाकडे जातोय का ? त्यातून काहीतरी निष्पन्न व्हावे लागते. १५ ऑगष्ट १९४७ ला हा भारतदेश स्वातंत्र झाला. २६ जानेवारी १९५० ला या देशाची घटना अंमलात आली. ३९५ कलमाच संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला अर्पण केलं. ते ३९५ कलम लिहीत असताना एक ४५ वे कलम भारतीय राज्यघटनेमध्ये समाविष्ट करण्यात आलं, काय सांगत ते कलम, प्रत्येकाला कम्पलसरी शिक्षण मिळाल पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना घटनेमध्ये ४५ वे कलम का घ्यावं लागलं. डॉ.बाबासाहेबांना एज्यूकेशन कम्पलसरी असं का म्हणाव लागल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे काही ठिकाणी लिहीतात शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि ते घेतल्यानंतर तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. एका उदात्त, एका उंचीवर घेवून जाण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेमध्ये ४५ वे कलम समाविष्ट केल. आयुक्त साहेब, तुम्हांला संविधानीक अधिकाराच्या आधारावर काही संविधानीक अधिकार संविधानाने प्राप्त केलेले आहेत, दिलेले आहेत तुमच्या ते अंगीकृत आहेत. आम्ही मंडळी पाच वर्षानंतर असू किंवा नसू पण तुम्ही अधिकारी या सगळया गोष्टींच्या अंमलबजावणीसाठी नेहमी कटिबध्द असले पाहिजेत. १८७२ ला जपानने एक प्रयोग केला की तिथला समाज शिक्षणाने सुधारला पाहिजे. हिरोशिमा आणि नागासाकीवर अमेरीकेनी केलेली बंबारी हे तिथल्या लोकांना दाखवून जातं, तिथली झालेली नापीकी जमिन या सगळया गोष्टीचा अनेकवेळा विचार केला पण तिथल्या माणसानं शिक्षणाच्या जोरावर १८७२ पासून आजपर्यंत जपानमध्ये केलेली प्रगती ही सुर्याला साक्ष ठेवून आहे. केवळ शिक्षणाच्या जोरावर आपण मोठं होवू शकतो हे उत्तर कोरीयाने दाखवून दिले आहे. आपल्या भारतातल केरळ हे छोटेसे राज्य १०० टक्के साक्षर आहे. त्यांनी सुध्दा सर्व शिक्षणाच्या जोरावर प्रगती केली. महाराष्ट्र हा थोर पुरुषांची परंपरा लाभलेला प्रदेश आहे. शिवाजी महाराजांनी सुध्दा संभाजी राजेना ते अशिक्षीत होते पण माझ्या राज्यकारभारामध्ये त्या अशिक्षीतपणामध्ये कारभार सुधारला म्हणून राजे संभाजीला त्यांनी काशीला पाठविले आहे. संभाजीराजेनी अतीशय

हस्तलिखीत तुलशीदासापेक्षाही चांगल साहित्य त्यांनी निर्माण केलं. बुध्दभूषण नावाचा ग्रंथ संभाजी महाराजांनी लिहीला आणि म्हणून शिक्षण हा बेस आहे. शिक्षणमंडळाला आपण करोडो रुपये देतो, खर्च करतो पण त्याच पुढ काय होतय. दत्ता सानेनी सांगीतल ११ शिक्षक होते, स्टाफ कमी आहे, पटसंख्या या सर्व गोष्टी घडु लागल्यात. मास्तर शिकवायचे सोडून राजकारण करायला लागलेत, पक्षाचे क्लब तिथं भरतात या सगळया गोष्टी मान्य आहेत पण हे करत असताना आपल्याला त्याकडे डोळसपणाने बघाव लागणार आहे. अमेरीका हा देश, ग्रीनब्रेन एकत्र आले, अमेरीका हा विवीध वसाहतीचा देश आहे. आज तो जगावर मोटोपॉवर का चालवतोतर केवळ ग्रीनब्रेन एकत्र आलं आणि शिक्षणाच्या जोरावर केलेली प्रगती तुम्हांला आणि मला टाळता येणार नाही. ही उदाहरण मी यासाठी देतोय की एकीकडे आपण स्मार्ट सिटीकडे जातो आहोत, जायला पाहिजेच, मी या मताचा आहे. झोपडपट्टी विरहीत शहर असले पाहिजे. कोणाला आवडतहो झोपडपट्टीमध्ये राहायला. कारण माझा जन्म झोपडपट्टीमध्ये झालेला आहे, झोपडपट्टीमध्ये वाढलो, शिक्षण महापालिकेच्या शाळेमध्ये घेतलं गटारावर अभ्यास करताना जी नाकामध्ये दुर्गंधी येतेनां अजूनही ते मस्तकात भिनलेलं आहे म्हणून मलाही वाटतनां की कुठेतरी पेन्टहाऊसमध्ये राहिला जायला पाहिजे. स्मार्ट सिटीची कल्पना खुप चांगली आहे, सुंदर आहे. आपण म्युनिसीपल सर्व्हिसेस प्रोव्हाईड करत असताना त्या कशा दिल्या पाहिजेत, माणस घडवली पाहिजेत, मुलं घडवली पाहिजेत. ८ जून पर्यंत साहित्य वाटप झालेले नाही. तो ठराव सुध्दा आपण मान्य केलेला आहे मग एवढा डिले का होतो. ठिक आहे, रस्ते होत राहतील, निवीदा निघत राहतील, बाकी फॅसिलीटी होत राहतील पण या शिक्षणाच्या गोष्टीकडे तुम्ही कानाडोळा का करता. या सगळया गोष्टीचा विचार केलातर शिक्षणामुळे आपल्याला अधिकार आहेत या सगळया गोष्टीचा आपण विचार करणे आवश्यक आहे. त्यांना स्टाफ दया, अजुन फंडींग दया. काही गोष्टी उभ्या राहून कराव्यात स्मार्ट सिटी संकल्पना डोळयासमोर ठेवत असताना या सगळया गोष्टी आपल्याला कराव्या लागणार आहेत. बायोमेडीकल वेस्टेज जे आहे ते जगताप डेअरीच्या परिसरामध्ये त्याठिकाणी इंजेक्शन, सलाईन बाटल्या तिथे सापडलेल्या आहेत. आरोग्य विभागाला आपण तात्काळ या सगळया गोष्टीसाठी सांगाव. नवीन जीआर प्रमाणे त्याकडे लक्ष दयावे. वॉटर हर्वेस्टींग संदर्भात नव्या गोष्टी करता येतील त्यामुळे आपण स्मार्ट सिटीकडे जावुया अशी संकल्पना मांडतो, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. हा विषय बसपासचा आहे. आतापर्यंत लोकांना बसपास मिळालेला नाही. शाळा चालू होवून एकदोन महिने होवून गेलेले आहेत. लोकांच्या तक्रारी वाढलेल्या आहेत. सुलभाताईनी सांगीतले ते ताबडतोब व्हायला पाहिजे. मुलांना त्रास होतो काही गरीब परिस्थितीतील लोकांना डेलीचे कलेक्शन देता येत नाही. त्यामुळे अतीशय महत्वाचा विषय आहे याची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी. मागे

पेपरला बातमी आली की आपल्या महापालिकेच्या शिक्षणमंडळात काही गैरकारभार चाललेला आहे. सहज आम्ही चौकशी केली, माहिती घेतलीतर आपल्या महापालिकेच्या शाळेत ज्या वस्तू भेटल्या पाहिजेत त्या भेटल्या नाहीत. रेनकोटच्या विषयी टेंडर काढले आहे. आता पावसाळा झालेला आहे रेनकोटचा विषय पहिला कॅन्सल करुन टाका. नाहीतर त्याचे परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत. पावसाळा संपलेला आहे आणि रेनकोटच्या संदर्भात मी आपल्याला आदिच माहिती दिली होती की हा विषय नुसतं करप्शन आहे दुसरा विषय काही नाही. आपल्या महापालिकेतील विदयार्थ्यांना आपण कपडे दिलेले आहेत. मागच्या वेळेस प्रत्येक शाळेतून आपण दोन-दोन ड्रेस दिलेले आहेत. त्यातील काही ड्रेस जमा करुन घेतले ते परत दिलेले नाहीत. त्या मुलांना अख्खे वर्षभर कपडे भेटलेले नाहीत. आज सुध्दा हा अमक्याच कंपनीचा ड्रेस आहे का नाही  हे चौकशीसाठी आपण देतो ते रिटर्न दिले पाहिजे. त्यामुळे वर्षभर झाल मुलांना ड्रेस मिळाले नाहीत. काही शाळेवरील मुख्याध्यापक रिटायर्ड झालेले आहेत त्याठिकाणी टेम्परारी मुख्याध्यापक दिलेले आहेत पण त्यांना अधिकार दिलेले नाहीत. मानधनावर काम करणा-या लोकांचा पगार निघत नाही कारण त्यांना सहीचा अधिकार नाही. त्यामुळे दोन-दोन, तीन-तीन महिने झाले त्या लोकांचा पगार झालेला नाही. माझ्या येथील शाळेमध्ये तीन महिने झाले मुख्याध्यापक रिटायर्ड झालेले आहेत आणि टेम्परारी चार्ज एका शिक्षीकेला दिलेला आहे पण ऑर्डर दिलेली नाही. छोटयाछोटया गोष्टी आहेत परंतु अतीशय महत्वाच्या आहेत. आपण करोडो रुपये शिक्षणमंडळावर खर्च करतो, शिक्षणमंडळ पुस्तक खरेदी आणि विक्रीसाठी आहे का. त्याठिकाणच्या शिक्षणाचा दर्जा सुधारला पाहिजे. याच्यामध्ये आपण गांभीर्याने लक्ष घाला आणि ताबडतोब कारवाई करावी व बदल घडवावा, धन्यवाद.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला वाटते मागची टेप वाजविलीतर बरे होईल, त्यांचेकडे असेल आणि तशी सोय असेलतर. तेच ते सांगायच का म्हणजे एक तसुभर सुध्दा त्यामध्ये फरक पडलेला नाही आपले मुलभूत कर्तव्य नाही माध्यमिक शिक्षण देणे, पण मार्गदर्शक तत्वानुसार एकदा स्विकारलतर ते सतीच वाण आहे ते पुर्ण केलच पाहिजे. आताच †›.गोरक्ष लोखंडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपासून चांगले सांगीतले आहे. म्हणजे थोडक्यात आपली कानउघडणी केलेली आहे. खरं म्हणजे पासचा विषय आहे परंतु आम्हांला बोलायचा कुठे चान्स मिळालेला नाही, त्याच्याशिवाय तुमच्याकडे येवून्ही वारंवार सांगतोय, त्याच्या वारंवार मिटींग होतात पण ते कधी होत नाही. आपल्याकडे नागरवस्ती विभाग आहे त्यांच्याकडुन पास देण्यासाठी सुरवात झालेली नाही. चार महिने झाले हे पुर्ण झालेले आहे एक युनिट टेस्ट झालेली आहे तरी अजून विदयार्थ्यांना पास नाहीत.  त्या विभागाला आदेश नाहीत असे मला वाटतय आणि म्हणून ते पुर्ण झालेले नाही बाकी २०१४ सालचे जे अनुदान आहे ते लोकांना मिळतात. प्राथमिक शाळेमध्ये शिक्षणमंडळा बद्दल जेवढ मी आधि बोललेले आहे त्यापेक्षा अजुन वाईट कोणी बोलणार नाही. तो कारभार कसा चालतो,

काय चालतो सगळेच त्यावर बोलतात. सगळयानी स्वत: तो विचार करायचा आहे. आमच्या शिक्षणमंडळाच्या सदस्यांनी, अधिका-यांनी सगळयांनी विचारपुर्वक ते काम करावं म्हणजे आपल्याला कोणाच्या टिकेला सामोरे जावे लागणार नाही. आपल्याकडे १८ माध्यमिक विदयालय आहेत, अजुन आपण पाच ते सहा सुरु करतो माध्यमिक विदयालयाला वाली नाही हे तुम्हांला कबुल कराव लागेल. तुमच्याकडे चार-पाच महिन्यापुर्वीच मे, जुनच्या दरम्यान मी हा विषय काढलेला होता की आपण एखादा माध्यमिक विभागप्रमुख आपलेच जे आहेत सहा.आयुक्त त्यातून ज्यांनी उच्च शिक्षण केलेले आहे, जे पोस्ट ग्रॅज्युएट आहेत, जे समर्थपणे हा विभाग सांभाळू शकतील अशांना दयायला पाहिजे. वय वर्षे १२ च्या पुढे मुलांचे संस्कारक्षम असं वय असतं आणि अशा वयामध्ये जे शिक्षण दिल जातं, जे संस्कार केले जातात ते आयुष्यभर उपयोगी पडतात. आपण या वयामध्ये जर त्यांच्या शिक्षणाची हेळसांड केलीतर आपल्या या एवढया खर्चाचा, त्या सगळया तुमच्या कार्याचा, या नावाचा काय उपयोग आहे. आपण वरवर नको करायला, मुलांना शिक्षण दिलेच पाहिजे त्यादृष्टिने तुम्ही जी सुरूवात केलेली आहे ती वाखण्यासारखी आहे. कौतूकास्पद जरी असलीतरी त्यातील जो पोकळपणा आहे तो राहता कामा नये. शिक्षक पोटतीडकीने शिकवतात. मी १९९२ ते १९९७ या सभागृहात होते, त्यावेळेस शुन्य टक्के रिझल्ट माध्यमिक शाळेचा दहावीचा लागायचा. आमच्याकडे केशवनगर शाळेचा १०, ५ टक्के असा २० टक्केच्या खालीच लागायचा. आता ती परिस्थिती आपली सुधारते आहे पण आपण सुधारत नाहीत, प्रशासन सुधारत नाही. कोणत्या गोष्टी लागतात त्याचा अजीबात विचार केला जात नाही. मला वाटते आयुक्त साहेब तुम्ही काल, परवा विभागप्रमुख बदललेत का. उबाळे मॅडम काम करत नाहीत असे नाही परंतु या प्राथमिक शाळेचे एवढे मोठे डोंगरासारखे काम आहे ते त्यांना जादा होते. मी विनंती करते की, प्राथमिक शिक्षण विभागप्रमुख आपल्याकडे वेगळे असावेत. आता आपल्याकडे नऊ हजाराच्या वर विदयार्थी माध्यमिक शाळेचे शिकतात आणि पद पण आपल्याकडे ३१५ मंजूर आहेत. पद मंजूर असतीलतर त्याच्यावर अनुदानही मिळते त्यासाठी आपले किती प्रयत्न आहेत. आता त्याठिकाणी माध्यमिक विभागप्रमुख असेलतर त्यांच्यावर आपण ही जबाबदारी टाकावी. खर्च न करता आपण जर सरकारकडून असे अनुदान घेतलेतर माध्यमिक विभाग खाजगी संस्था काही उगीच चालवत नाहीत. पन्नास-पन्नास, साठ-साठ वर्षे शाळा अनुदानावर चालवतात. आपण अनुदान घेतले पाहिजे आपण ते घेत नाहीत. अनुदानीत पद आपण भरले पाहिजे ती सुध्दा भरण्याची आपली वृत्ती नाही म्हणा आपल्याकडे काम करण्याची इच्छा शक्ती नाही आणि म्हणून शिक्षकाविना विदयार्थी अशी परिस्थिती आहे. आपण इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली, उद्देश चांगला आहे. मला वाटते मराठी माध्यमिक मध्ये प्रत्येक शाळेमध्ये इंग्रजीचा वर्ग हा सुरु केलाच पाहिजे. कारण आता ज्याठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या त्याठिकाणी भरमसाठ मुलांनी ॲडमीशन घेतलेले आहेत. एक ते दोन लाख

रुपये युकेजी, एलकेजीला डोनेशन आहे. बालवाडीला लाख आणि दोन दोन लाख डोनेशन देवून सुध्दा तिथं जागा मिळत नाही. गोरगरीब पालक फक्त बघत राहतात. त्यांच्यासाठी आपण सोय केलेली आहे त्याबद्दल खरोखरच तुम्ही अभिनंदनास पात्र आहात. इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या बद्दल. पण असेच इंग्रजी माध्यमाचे वर्ग मराठी शाळेत एक-एक सुरु करावेत त्यालाही खुप प्रतिसाद लाभेल. नाहीतरी आता मराठी माध्यमाच्या वर्गाची संख्या कमी होतात याची माहिती आपण घ्यावी. वर्गाची संख्या कमी होते. वर्ग २९ चा, वर्ग २० चा, वर्ग ३० चा ही काही संख्या नाही. तरी अशाप्रकारे तुम्ही हे करावे. याठिकाणी जे पद मंजूर आहेत ते भरण्याचा प्रयत्न करावा म्हणजे मुलांचे शैक्षणिक हाल होणार नाहीत. साहेब, आपल्याकडे ३१५ पद मंजूर आहेत फक्त २६३ पदे भरलेले आहेत पैकी ९२ शिक्षक रिटायर्ड झालेले आहेत. महिला शिक्षीका ज्या सहा महिन्याच्या रजेवर जातात त्यांच्या जागेवरही शिक्षक भरले जात नाहीत, मुलांचे शाप घेवू नका. त्याठिकाणी ताबडतोब भरती करावी. विभागप्रमुख त्वरीत तुम्ही नेमावेत. प्रत्येक शाळेमध्ये पर्यवेक्षक पाहिजे. पर्यवेक्षक आपले आपले काम सांभाळून तो पर्यवेक्षकांचे काम करेल. स्वच्छतेच्या बाबतीतही आपण लक्ष दयावे. प्रभारी दहा मुख्याध्यापक आहेत, त्यांच भविष्य त्यांनाच माहित नाही. ते पुन्हा मुख्याध्यापक होणार की नाहीत याबद्दलही शाश्वती नाही. तरी असे प्रभारी असलेले मुख्याध्यापक नियमात बसत असतीलतर त्यांना त्वरीत बढती दयावी किंवा त्यांना त्यांच्या जागेवर पाठवा, तुम्हांला कोण मुख्याध्यापक नेमायचे ते नेमा. अशा अनेक तक्रारी आहेत. मी मागच्या वेळेसच सांगीतल होत की प्रत्येक शाळेत एखादा संगणक मुलांना दाखविण्यासाठी तरी दयावा. किती दिवस पुन्हा पुन्हा तेच सांगते मी प्रयोगशाळा आहे की नाही. साहेब तुम्ही ज्या शाळेत शिकलात त्याठिकाणी प्रयोगशाळा होती का नाही आणि ती कशी होती. खेळाचे साहित्य नाही. काय मोठीमोठी क्रिडा धोरण तुम्ही राबवता. त्याठिकाणी कोटीच्या कोटी उड्डाणे घेताय, शाळेत क्रिडा साहित्य दया, खेळू दयात मुलांना. जे ३८-३९ क्रिडा शिक्षक महापालिकेनी तयार केलेले आहेत तीन महिन्याच्या वर झालेले आहेत तुम्ही क्रिडा विभागाला आदेश दिलेले आहेत. या शिक्षकाची यादी सुध्दा माझ्याकडे आलेली आहे. त्यांनी असे लिहीलेले आहे प्राथमिक शाळेला एक शिक्षक दोन शाळेला. एक बीपीएड क्रिडा शिक्षक दोन शाळेमध्ये जावुन त्यांना क्रिडा शिक्षण देतात. उबाळे मॅडमने सांगावे हा कुठला प्रकार आहे की प्राथमिक शाळेमध्ये क्रिडा पर्यवेक्षक जातात, क्रिडा बीपीएड शिक्षक नेमले जातात. तुमच्या प्राथमिक शाळेमध्ये असा काही नियम आहे का? मग तुम्ही का म्हणून केले, का उगीचच वाढवून ठेवलेले आहे. डीएड शिक्षक परिपुर्ण असतो. क्रिडा पासून सर्व विषय तो शिकवू शकतो. त्याप्रमाणे त्यांना डीएडमध्ये प्रशिक्षण दिले जाते. तुम्ही या शिक्षकांना जे बीपीएड शिक्षक माध्यमिकसाठी उपयोगी आहेत ते तुम्ही तीकडे का पाठवतात आणि ते किती वर्ग घेतात, किती शाळा घेतात काही नियंत्रण कोणाचे नाही. हे शिक्षक क्लास-१ अधिका-यापेक्षाही जास्त पगार घेतात आणि ते कुठे नौकरी करतात हे माहित नाही. याच्या

प्रमाणे काही निवडणूक विभागात पाठविलेले आहेत. निवडणूक विभागाला एलबीटीचे कर्मचारी आहेत ते दयावे. काही विभागातील बैठे लोक आहेत त्यांना दयावे निवडणूक विभागामध्ये पाठवून आणि बीपीएड झालेले जे शिक्षक आहेत त्यांच्या ज्ञानाचा उपयोग, त्यांच्या अनुभवाचा उपयोग आपल्याला भाषा विषय शिकवण्यासाठी होईल. फक्त माध्यमिकच नव्हेतर प्राथमिक शाळेला सातवी आठवीला त्यांच्या ज्ञानाचा नक्कीच उपयोग करुन घेता येईल. माझ्याकडे लिस्ट आलेली आहे क्रिडा विभागाला मोठे बजेट घेतलेले आहे त्यांनी या शाळेच्या शिक्षकांना वगळून इतर शाळेचे शिक्षक घेतात बीपीएड वगैरे आवश्यक नाही. प्रशिक्षण झालेले वेगवेगळया खेळामधले असे पारंगत व्यक्ती त्यांनी घ्याव्यात आणि शिक्षकांना शाळेला वर्ग करण्यासाठी त्यांचा सुध्दा विरोध नसेलच कारण त्यांच्याही कामाला ते येत नाहीत. तरी अशाप्रकारे दोन-चार दिवसामध्ये कार्यवाही करुन आपल्याकडे जे कमी शिक्षक आहेत ते क्रिडा शिक्षकांमधुन मिळतील एवढेच सांगते.

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.नगरसेवक, पत्रकार बंधु. हा शाळेच्या पासचा विषय चालू आहे. शाळेच्या बाबतीत बोलायचे म्हणलेतर महापालिकेची शाळा म्हणजे आपल्या शिक्षकांना धर्मशाळाच वाटते. कारण परिस्थिती अशी आहे की शिक्षक लोक आपल्या दोन-दोन, तीन-तीन एकएका शाळेवर आहेत. त्यांच्या ॲडजेस्टमेंटनुसार त्यांच चालत म्हणजे प्रत्येकाच्या ॲडजेस्टमेंटनुसार चाललेल आहे. वडमुखवाडीच्या शाळेची परिस्थिती अशी आहे की शिक्षकांकडे पैसे मागण्यासाठी लोक शाळेत येतात. मी उबाळे मॅडमलाही पाठीमागे सांगीतले की हे शिक्षक शाळेत येत नाहीत. दुसरा विषय असा आहे की, जुने मटेरीअल शाळेतील आहे ते परस्पर कुठे नेलं, विकल त्याचाही तपास नाही. उबाळे मॅडमला मी दोन-तीन वेळा फोनवरती तक्रार केली होती. वडमुखवाडीच्या शाळेचे फार मोठे नुकसान झाले आहे तिथं मुलही राहिलेली नाहीत. २० ते २२ मुलं राहिलेले आहेत कारण की शाळेचा दर्जा एकदम निकृष्ठ झालेला आहे. आयुक्त साहेब आपल्याला विनंती करायची आहे की आपण ज्या शाळेमध्ये मदतनीस देतो त्यांचे चार चार महिने पगार होत नाहीत. ते एवढं कष्ट करतात आणि त्यांना पगारासाठी त्या ठेकेदाराच्या पाठिमागे लागावे लागते.

**मा.महापौर -** हा ठेकेदारांचा विषय नाही बसपासचा विषय आहे त्याला धरुन बोलावे.

**मा.रमा ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु भगिनीनो. आज स्थायी समितीची मिटींग होती. मी या विषयी स्थायी समितीमध्ये बोलले होते. दापोडीमधील मुलांना अजूनपर्यंत कपडे भेटलेले नाहीत त्यांना पुस्तक भेटलेले नाहीत. त्यांना पुस्तक कधी भेटणार व कपडे कधी भेटणार हे सांगावे व दोन शिक्षक पण नाहीत. उर्दु स्कुलमध्ये शिक्षक कमी आहे त्याठिकाणी सुध्दा शिक्षकांचा बंदोबस्त करावा त्यांना ताबडतोब कपडे आणि पुस्तक देण्यात यावीत अशी मी नम्रं विनंती करते, धन्यवाद.

**मा.भारती फरांदे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आणि पत्रकार. माझ्या प्रभागाची जी शाळा आहे त्याठिकाणी पटसंख्या कमी आहे म्हणून शिक्षक कमी आहेत. आणि शिक्षक कमी आहेत हा मुलांचा दोष नाही. महिला शिक्षीका आहेत त्या सुट्टीवर गेल्या आहेत मग मुलांनी शिकायच कोणाकडे. तीथ असं चाललेल आहे की मुलांची आणि मुलींची एकत्रीत शाळा करा. आज तीन महिने झाले एक महिला शिक्षीका आहे ती काय करते एकाच वर्गामध्ये पहिलीचे मुलं बसविते, त्याच वर्गामध्ये तीसरी आणि चौथीची मुलं असतात. यांना सांगायच, म्हणा बे एक बे ची पाडे. पुर्वी खेडयागावात शाळा चालते तशा पध्दतीने आपल्याकड प्राधिकरणामधील शाळेच नियोजन चालू आहे. त्याच्यामध्ये पटसंख्या कमी असेलतर मुला मुलींची शाळा एकत्रीत करा. मागे मा.उपमुख्यमंत्री यांच्या बरोबर मिटींग झाली तेव्हा मी सांगीतले होते अपंग मुलांचे बसपास तीन तीन महिने झाले अजून मिळालेले नाहीत त्यांचे आई-वडील खर्च करतात. त्यांच्याकडून दाखला तुम्ही घेतलातर तसे तुम्ही का सुरु केले नाहीत त्यांचे आई-वडील तो खर्च करतात. त्यांच्याकडून तुम्ही दाखला घ्या ते का सुरु केले नाही. त्यावेळेस तुम्ही हो म्हणाला होतात परंतु अजुनही ते केलेल नाही तरी ती सुधारणा करावी, धन्यवाद.

**मा.साधना जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शाळेचा विषय चालू असताना प्रभाग क्र. ५ जाधववाडी या भागामध्ये गेली चार महिने झाले शाळेवर शिक्षक नाहीत. त्याठिकाणी बदली शिक्षक म्हणून अजीबात आलेल नाहीत. वारंवार पत्र दिलेले आहेत. तक्रार केलेली आहे मी सुध्दा पत्र दिलेले आहे. तीन शिक्षक कमी आहेत. एका शाळेवर एका वर्गामध्ये दोन वर्ग भरवतात. इंग्रजी आणि मराठी शिक्षकांना खुप अवघड जाते. कशा पध्दतीने त्यांनी मुलांना शिकवायचं. जाधववाडीत पटसंख्या चांगली असताना मुलांना व्हरंडयात बसावे लागते आणि बालवाडीची शाळा जी आहे ती तालमीमध्ये मुलांना बसवतात. जाधववाडीतील शाळेमध्ये वर्ग, खोल्या बांधुन घ्याव्यात आणि त्या शाळेत शिक्षकांची कमी आहे ती लवकरात लवकर पुर्ण करावी.

**मा.महापौर -** हा विषय लेखाशिर्षाचा आहे त्याच्यावर चर्चा करावी.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधुनो. मा.महापौरांनी सांगीतल विषयावर चर्चा करा परंतु विषय लेखाशिर्षाचा असलातरी आमच्या सर्वांच्या अडचणी ज्या आहेत त्या मागची भावना समजावुन घ्यावी की आम्हांला मनातून ख-या अर्थाने समस्या सांगायच्या आहेत. आज जुन, जुलै, ऑगष्ट संपत आलेला आहे तीन महिने झाले शाळेची अवस्था आहे तशीच आहे. म्हणजे शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना सर्व साहित्य पुरवणार असं आमच प्रशासन हे पोकळ सांगत आज तीही वस्तुस्थिती समोर येते. खरंतर मुल ईकॉनॉमीकली बॅकवर्ड असतात म्हणूनच ते आपल्या महापालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण घेतात ही वस्तुस्थिती तुम्हांलाही माहिती आहे आणि मलाही माहिती आहे. मग अशा मुलांना

जर आपण साहित्य देवू शकत नसेलतर कशाला तुम्ही शाळा चालवता, कशाला शिक्षकांचे पगार काढता सगळ बंद करा. म्हणजे कोटयावधी रुपये आपण या सगळया खोटया कारभारावरती खर्च करतो ते सगळ बंद होईल. फक्त खाण्याचे कुरण झालेले आहे ते बंद करावे आणि दयायच असेलतर वेळेत दया. म्हणजे ते वर्ष संपल की त्यांना पुस्तक मिळतील, वर्ष संपल की त्यांना ड्रेस मिळतील. कशासाठी आपण हे उठाठेवी करतो. आज माध्यमिक शिक्षणमंडळ त्याठिकाणी प्रभारी अधिकारी किती वर्षे झालेले आहेत. मागे तीन ते साडेतीन वर्षे झाले, आपल्याकडे कांबळे मॅडम होत्या, नंतर सातवसर आले आणि आता उबाळे मॅडमकडे चार्ज आहे. माध्यमिक विभागाला आपण एक अधिकृत शिक्षणाधिकारी देवू शकत नसेलतर कशासाठी आपण हे सर्व करतो. आता आम्ही सगळया समस्या मांडलेल्या आहेत. आता उबाळे मॅडमनी सांगाव की किती शाळेनां मुख्याध्यापक नाहीत. ज्याठिकाणी राजाच नाहीतर प्रजा काय करणार आहे. तिथे एकादया शिक्षकाच्या गळयात दोर बांधलेली असते की तुम्ही मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी पहा. ते ऑफिस काम सांभाळून वर्ग सांभाळून, पालिकेमध्ये जाणं, कागदपत्र पोहचविणं कोणकोणत काम ते शिक्षक करणार. त्यामुळे त्यांच वर्गावरती दुर्लक्ष होतं, शाळेचे पुर्ण वातावरण गढूळ होतय. म्हणजे आपल्याकडे एक समस्या आहे का. हे शालेय पदाच्या बाबतीत झाले. तुम्ही स्वच्छतेला कर्मचारी ठेवलेले आहेत. तुम्ही विचारा आज सुध्दा किती वेळा फोन केले. शिक्षणमंडळात जे आपण स्वच्छता कर्मचारी ठेवतो. खाजगी शाळेमध्ये का स्वच्छता राहते, का तिथल्या स्वच्छ फरशा धुतल्या जातात. आमच्या शाळेतील स्वच्छता का होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. याठिकाणी बोललेतरी काही फरक पडत नाही. आम्ही बोलतो ते रेकॉर्डवर येते पुन्हा जैसे थे. आजही त्या लोकांना पगार मिळालेला नाही. परवा एका शाळेमध्ये चोरी झालेली आहे कातर आमच्याकडे प्रायव्हेट सिक्युरीटी आहे. मग ती चोरी झाली त्याला शिक्षक जबाबदार का, कोण जबाबदार. प्रत्येक वेळेला याच गोष्टी किती वेळा बोलणार. त्याठिकाणच्या टॉयलेट ब्लॉकची अवस्था वाईट आहे. मी उबाळे मॅडमच्या निदर्शनास आणून दिलेल होत की एका शाळेत शिक्षकांनी स्वत:च्या मर्जीने खाजगी शिक्षक ठेवलेले होते. शिक्षणमंडळाची परवानगी नाही, कोणाचीही परवानगी नाही. मी तानाजी शिंदे, अतिरीक्त आयुक्त त्यांच्याही निदर्शनास आणुन दिल तरी त्यांच्यावर कारवाई झालेली नाही परंतु एखादा मुख्याध्यापक सहन करणारा असेलतर आम्ही त्यांच्यावर पाचशे, हजार वाट्टेल ती दंडात्मक कारवाई करतो कारण त्यांच्या शाळेमध्ये एक पाईप सापडला त्यांच्या शाळेच्या आवारामध्ये इलेक्ट्रीकच ऑफीस आहे मग त्यांच्यावर कारवाई होऊ शकते परंतु याठिकाणी दाखवून दिल, वस्तुस्थिती तशी झाली होती त्यांनी ते कबुल केल त्यांच्यावर कारवाई होत नाही. म्हणजे कुठेतरी आपण सहन करणा-यांना पायदळी तुडवायचा प्रयत्न करतो आणि जे सहन करत नाहीत त्यांना मात्र आपण मोकाट सोडतो. याच्यामध्ये तुम्ही सगळया गोष्टीला प्रॉपर सिच्यूएशन घेवून एक चांगल्या पध्दतीन त्याला ॲक्टीव्हेट करा. इंग्रजी शाळेला अनेक

कंपन्या शाळा चालवण्यास तयार आहेत त्यांना देवून टाका आणि तुमची जबाबदारी झटका. म्हणजे आपल कुठतरी मानसीक समाधनतरी होईल की या सर्व शाळा चांगल्या चालतात. मी सांगीतलेल्या मुदयावर लक्ष घालावे माध्यमिक शिक्षण विभागाला शिक्षणाधिकारी दयावा, धन्यवाद.

**मा.अनिता तापकीर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सभागृह व पत्रकार बंधु आमच्या तेथे पवनानगरमध्ये त्या शाळेचे काम हाळूहाळू चाललेले आहे. त्याठिकाणी पाचवीचा मुलगा दहावीला गेलातरी त्या शाळेच काम पुर्ण होत नाही. ते काम लवकरात लवकर करावे अशी मी विनंती करते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी. आयुक्त साहेब, विषयावर बोललतर मुद्दा वेगळा आहे परंतु विषयाची संधी घेवून जर बोललतर याचा अर्थ तुम्ही एकटे काम करणारे असुन उपयोग नाही पण तुमच्या खालची जी फळी आहे ती काम करते का नाही याचं तुम्ही आत्मपरिक्षण करायला पाहिजे. गेले तीन महिने झाले फरांदेताईनी मिटींगमध्ये सांगीतल होतं बसच्या व्यवस्थेचं. बसपास विषयी आम्ही तुम्हांला बोललो, पालक तुम्हांला येवून भेटले. आयुक्त साहेब तुम्ही शंभर टक्के विषय ठेवत नाहीत. सभेमध्येच सांगता. का तुम्ही तसं सांगता की मी सांगीतल्यानंतर तीन-चार महिन्यांनी करा. आम्हांला असं माहिती आहे की तुम्ही काम काहीही पेन्डीग ठेवत नाहीत. परंतु प्रत्येक गोष्टीला चार-चार, सहा-सहा महिने पुढे लागतात. म्हणून काय होतं की विषय निघाल्यानंतर कुठला विषय कुठं जातो आणि माझ्या सहकार्याना असं म्हणाव लागत की महापौरताई मी सॉरी म्हणतो पण मला या विषयावर बोलू दया. कोणत्या गोष्टी शिक्षणमंडळाच्या या सभागृहाने थांबविल्या का तुम्हांला बसच्या पाससाठी थांबवलं. का हे २५ टक्के करुन देण्यास थांबवलंय. पिंपरी चिंचवड सारखे नगरसेवक दुसरीकडे कुठेही सापडणार नाहीत. एवढे सगळे तुम्हांला मिळत असताना प्रत्येक गोष्टीला कशासाठी म्हणून या सगळया गोष्टी व्हायला पाहिजेत हे मला काही कळत नाही. नुसतं बोलून चालणार नाही, मुख्याध्यापकांची कमी आहे आणि काही मुख्याध्यापक असूनही उपयोग नसल्यासारखे आहेत असे जे बोललेले आहेत ते त्यांच्या मनातली तळमळ आहे म्हणूनच बोललेले आहेत. याच्यापुढे तुम्ही ॲक्शन घेतली पाहिजे. मिटींगमध्ये गुणवत्ता सुधारण्यासाठी ज्ञानप्रबोधिनीला दहा शाळेचे नियोजन करुन दिलेले होते. त्यामिटींग मध्ये सुध्दा एक मुख्याध्यापीका झोपल्या होत्या. आम्ही सांगीतल्यानंतर पण त्या परत झोपल्या होत्या. तुमच्या मिटींगमध्ये तुम्हांला दाखवून दिलं की अधिकारी कसे झोपलेले असतात. मग तुम्ही एकटयांनी असं चालून चालणार आहे का, नाहीतर तुमच्या खालची जी फळी आहे त्यासाठी आयुक्त साहेब तुम्हांला तुमचा स्वभाव थोडासा वेगळया पध्दतीने करावा लागेल. योग्य पध्दतीने तुमचे काम चालले नसेलतर या गोष्टी घडणार आहेत. बसचा विषय दोन दिवसात तुम्ही मार्गी लावावा. कुठलेही साहित्य

पुरविण्यासाठी आम्ही तुम्हांला आडविलेले नाही. कायदयाच्या चौकटीमध्ये बसवून काय अडचण आहे ती सोडवावी. शाळेची गुणवत्ता सुधारली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करते आणि हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.महापौर -** उपसूचना स्विकारली का.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, स्पष्टीकरण मागीतलेल होते. शिक्षण मंडळाचे अधिकार सांगावेत.

**मा.खांडकेकर (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माध्यमिकचा बसपासच्या लेखाशिर्षाचा विषय आहे. आपण जी भावना व्यक्त केली त्याप्रमाणे आपण हे सुरु करु. मतीमंदाच्या पासेस बाबतीत आपण २०११ मध्ये ५० मतीमंदाना पास दिलेले होते त्याच्यानंतर असे निदर्शनास आलं की पीएमपीएमएल त्यांना पासेस देतात. त्याच्यानंतर डुप्लीकेशन होवू नये म्हणून आपण थांबविलेले होते पण या वर्षी पीएमपीएमएलने दिले नाही असे निदर्शनास आलेल आहे. त्यांना पत्रही दिलेले आहे की तुमच काय धोरण आहे ते आम्हांला कळवा म्हणून, म्हणजे डुप्लीकेशन होणार नाही परंतु त्यांनी अदयापपर्यंत उत्तर दिले नाही. मी दोन दिवसात जातीने लक्ष घालून त्यांच्याकडून उत्तर घेण्याचा प्रयत्न करतो आणि ते करत नसतीलतर आपल्याकडून आपण करु.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, उत्तर चुकीच दिलेल आहे. मागच्या आठ दिवसापुर्वी मी त्यांना फोन केलेला होता. शहरात पासेस देतो. तीन शाळा मतीमंद मुलांच्या आहेत. ब्रम्हदत्ता आहे, कामायनी आहे, साई संस्कार संस्था आहे, कल्याणी आहे. या शाळेची एकच बस फिरत असते. चुकीच उत्तर अधिकारी देतात.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. फरांदेताईनी हा विषय मागे माजी मा.उपमुख्यमंत्री यांच्या मिटींगमध्ये काढलेला होता ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर आपण ताबडतोब सूचना दिलेल्या होत्या की हे मतीमंद मुल आहेत मध्यंतरी त्या मुलांचे पाल्यही भेटलेले होते. एकतर आपल्या घरात मतीमंद मुलगा असल्यामुळे आदिच ते डिस्टर्ब असतात त्या मुलांना घराच्या बाहेर कुठतरी फिरायला घेवून गेल्यानंतर त्यांना बरे वाटते अशी त्यांची मानसीकता आहे ही वस्तुस्थिती आहे. त्याचे गांभीर्य लक्षात घेवून आम्ही ताबडतोब पास दयायला सांगीतले होते. खांडकेकर यांनी परस्पर पीएमपीएमएलला विचारण्याचा जो काही पत्रव्यवहार केला तो ठिक आहे त्यांचा उद्देशही योग्य असेल की डुप्लीकेशन होवू नये पण एवढा वेळ लावण्याची गरज नव्हती. आपण पासेस देवून टाकायला पाहिजे होते. त्यांना पत्र देवून टाकायच. ५० विदयार्थी आहेत.

**मा.मंगलाताई कदम -** मा.माहापौर साहेब, ५० विदयार्थी नाहीत. चार शाळा शहरामध्ये आहेत. त्या एका एका शाळेचे कमीत कमी १५० विदयार्थी आहेत. शाळाबाहय विदयार्थी आहेत.

कामायनीला फक्त १०० विदयार्थ्यांची मान्यता आहे, ब्रम्हदत्तला फक्त १०० विदयार्थ्यांची मान्यता आहे. माझ्याकडे शाळेत १५० विदयार्थी आहेत. कल्याणीमध्ये ४० किंवा ५० ते ६० विदयार्थी असतील. अनुदान देताना प्रत्येकवेळेस वेगवेगळे करतो. एकदाच तुम्ही ठरवाव नसता देवू नका.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. दरवर्षी प्रमाणे मतीमंद मुलांचे पास आपल्या महापालिकेकडून दिले जातील. डुप्लीकेशन होवू नये म्हणून पीएमपीएमएलला पत्र दिले जाईल. सर्व मतीमंद मुलांचे पासेस चार दिवसात महापालिकेनी दयावेत आणि पीएमपीएमएलला डुप्लीकेशन बाबतीत पत्र दयावे की परत तुम्ही त्यांना डबल पास देवू नये. दुसरा विषय शाळेतील पासचा आहे. चार दिवसामध्ये सर्वच मतीमंद मुलांचे पास दयावेत तसेच स्कुलच्या पासेसचा विषय आहे तो माध्यमिक शाळेकडे आहे. उबाळे मॅडमनी माझ्याकडे एक पत्र ठेवलेले आहे. आम्ही व्यवस्थापकीय संचालक, पुणे महामंडळाला पत्र लिहीलेले आहे, पण उबाळे मॅडम फक्त पत्र लिहून चालत नाही. त्यांना आपण पैसे देतो, ॲडव्हान्स पैसे देतो. तीन महिने झाले शाळा चालू होवून पासचे पत्र देवून चालणार नाही. पीएमपीएमएलच्या आष्टेकर साहेबांना माझ्याकडे बोलून घ्यावे. आपण त्यांना स्पष्ट विचारु तुम्ही पासेस दया नाहीतर त्यांच पासेसच काम आपण करु. आपल्याकडे कर्मचारी आहेत. आपण आपल रेकॉर्ड त्यांच्याकडे देत जावू पीएमपीएमएल पासेससाठी फार पळवते अशी सर्वांचीच भावना आहे. पुढील पंधरा दिवसामध्ये तेही काम मार्गी लावण्याचा मी स्वत: प्रयत्न करतो. मा.आर.एस.कुमार यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. अधिकारा बद्दल त्यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की वस्तुस्थिती आहे की राज्यशासनाने आणि हायकोर्टाने तो शिक्षणमंडळाचा ॲक्ट रद्द केलेला आहे. शासनाने धोरणात्मक निर्णय असा घेतलेला आहे की सध्याच अस्तित्वात असलेलं शिक्षणमंडळ की ते जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत ते पुर्वी प्रमाणेच काम करेल. मा.विनोद तावडे, मंत्रीमहोदय यांनी सुध्दा आपल्याला एक पत्र दिलेले आहे. शासनाचे धोरण असे आहे की आता महापालिकेची मुदत फेब्रुवारी २०१७ पर्यंत आहे तोपर्यंत ते चालू राहील. त्यानंतर मात्र नवीन शिक्षणमंडळ अस्तित्वात येणार नाही. हे सगळे अधिकार महापालिकेला आहेत म्हणजे पर्यायाने स्थायी समितीला, महासभेला आणि आयुक्तांना मिळतील. टेंडरचा विषय अवघड आहे. त्या विषयामध्ये साहित्या बद्दलच्या टेंडरमध्ये हायकोर्टात पिटीशन दाखल झालेले आहे. हायकोर्टाने स्टे दिला आहे आणि तो हायकोर्टाचा स्टे असल्यामुळे आपल्याला त्या पध्दतीच्या टेंडर मध्ये पुढे जाता येत नाही. हायकोर्टाचा स्टे उठवून बुट किंवा इतर साहित्य लवकरात लवकर घेण्यासाठी मी स्वत: अतिरीक्त आयुक्तांना घेवून बसतो. रेनकोट कॅन्सल म्हणताततर ठिक आहे.

**मा.आर.एस.कुमार-** मा.महापौर साहेब, तुम्ही वेळेमध्ये लक्ष दिल असततर त्या मुलांना बुट व इतर साहित्य मिळाल असतं.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, त्यामुळेच मी मा.महापौर मॅडमला विषय सुरु होण्यापुर्वीच विनंती केली. मा.महापौर मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणमंडळाची पुढील आठ दिवसात बैठक घेण्यात येईल आणि त्यांच्या समक्ष सगळया गोष्टीचा आढावा घेण्यात येईल.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता:

ठराव क्रमांक - ७३४ विषय क्रमांक - ४

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/८४/२०१५ दि.२३/०७/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२०८५ दि.४/८/२०१५

माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात जमा बाजूला असे कोणतेही लेखाशिर्ष नसल्याने सदरची खाजगी मान्यताप्राप्त विदयालयाकडील विदयार्थ्यांकडुन **२५ टक्के** रक्कम जमा करण्याबाबत नव्याने लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे. माध्यमिक शिक्षण विभागाकडील सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात जमा बाजूला **खाजगी विदयार्थी बसपास २५ टक्के रक्कम जमा** हे लेखाशिर्ष नव्याने निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात काही तातडीचे व अत्यावश्यक कामांचा समावेश करावा लागणार याकामी फक्त तरतुद वर्गीकरण करावे लागणार आहे.

१) खालील कामा मधून वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्रं. | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१५-१६ ची तरतुद लाख | वर्गीकरण र.रु.तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील आरक्षण क्र.जी.पी.१३२ (बस टर्मिनस) विकसित करणे. | विशेष योजना | ५७ | ४० | १२००००००० | ८५०००००० | ४००००००० |

२) खालील कामाचा अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्रं. | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१५-१६ ची तरतुद लाख | वर्गीकरण र.रु.तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | संभाजीनगर शाहूनगर येथे स्थापत्य विषयक कामातील उर्वरित कामे करणे. | विशेष योजना | नविन काम/विदयुत विभाग | | ७,००,००,००० (७ कोटी) | ०.०० | ३,५०,००,००० (३ कोटी ५० लाख) |
| ३ | प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी येथील स्केटींग ग्राऊंड मध्ये आच्छादन करणे व शाळेय सुविधा निर्माण करणे. | २४) शाळा मैदाने आणि क्रिडा संकुल उभारणे व दुरुस्ती करणे | नविन काम स्थापत्य विशेष योजना | | १००००००० (१ कोटी) | ०.०० | ५०००००० (५० लाख) |
| ४ | प्रभाग क्र. २८ W-Sector ते टेल्को कंपनी सिमाभिंती लगत रस्ता विकसीत करणे. | ९) रोड पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टीम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे | नविन काम स्थापत्य विशेष योजना | | २०००००००० (२ कोटी) | ०.०० | ५००००००० (५० लाख) |

तसेच सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील खालील कामामध्ये नव्याने बदल करणेत आलेला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्रं. | अ. क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१५-१६ ची तरतुद लाख | वर्गीकरण र.रु.तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| **खालील कामाचा अंदाजपत्रकात समाविष्ट आहे या मधून तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.** | | | | | | |
| १ | पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील आरक्षण | ५८ | ६२ | ४०,००,००,००० (४० कोटी) | ५,००,००,००० (५ कोटी) | २,००,००,००० (२ कोटी) |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क्र. ३०१ येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा भव्य पुतळा उभारणे व सहल केंद्र पर्यटन स्थळ | | | | | |
| **खालील कामाचा अंदाजपत्रकात समावेश करण्यास तसेच वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.** | | | | | | |
| २ | प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथे बर्ड व्हॅली येथे लेसर शो साठी आवश्यक कामे करणे. | नविन काम/ विदयुत विषयक | | १०००००००० (१० कोटी) | ०.०० | ३००००००० (३ कोटी) |
| | एकूण | | | | ५००००००० (५ कोटी) | ५००००००० (५ कोटी) |

तसेच संभाजीनगर प्र.क्र.९ मध्ये उर्वरीत दिव्यांचे नुतनीकरण करणे, तसेच विदयुतविषयक कामे करणे या कामाचा सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात समावेश नाही. परंतु सदर काम करणे आवश्यक असल्याने, सदर कामाचा समावेश सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात करुन अंदाजपत्रकातील पानांक ५७ अ.क्र. ४० येथील प्र.क्र.९ संभाजीनगर येथील आरक्षण क्र. जी.पी.१३२ ( बस टर्मिनस विकसित करणे ) हया कामावरिल र.रु. ९ कोटीमधुन र.रु. ५ कोटी सदर कामाकरीता वर्गीकरण करुन स्थापत्य विभागाकडील प्रकल्पाअंतर्गत अंदाजपत्रक २०१५-१६ मधील पान क्र. ५६ अ.क्र.४ या कामाअंतर्गत नव्याने निविदा काढून सदर काम करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्रमांक ५७ पिंपळ गुरव मध्ये ठिकठिकाणी रुंदीकरण झालेल्या व मनपाचे ताब्यात आलेल्या रस्त्यांचे खडी मुरुम व बीबीएम करणेकामी निविदा नोटीस क्रमांक ३/६७-२०१४-१५ चे कामास रक्कम रु. ९८,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता आहे. सदर कामास वाढीव र.रु. ८३,७५,०००/- (एकूण त्र्याऐंशी लाख पंच्याहत्तर हजार फक्त) ची आवश्यकता आहे. म.न.पा. चे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकांतील पथ-खडी मुरुमाचे रस्ते या लेखाशीर्षावरील पान क्रमांक २०० अ.क्र.३० वर नमूद केलेल्या कामावर पुरेशी तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. तरी म.न.पा.चे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकांतील पान क्र.५९३ अ.क्र.१ वर रक्कम रु. २४१.१४ कोटी तरतूद असून त्यामधुन पथ खडी मुरुमाचे रस्ते या लेखाशीर्षावरील पान क्र. २०० अ.क्र. ३० या लेखाशीर्षावरील कामासाठी रक्कम रु. ८३,७५,०००/- या रकमेच्या तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. तसेच कासारवाडी प्रभाग क्र. ६३ मधील खाली नमुद केलेल्या विकास कामांना अपुरी तरतुद असल्यामुळे सदर कामांवर तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे तरी सदर कामांवर खालीलप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखा शिर्ष | पान क्र. | अनु क्र. | मुळ तरतुद | | | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंदाजपत्रकीय रक्कम | सन२०१५-१६ ची तरतुद | सन २०१५-१६ ची आवश्यक तरतूद | | |
| २ | प्र.क्र.६३ कासारवाडी येथील स्मशानभूमीचे नूतनीकरण करणे. | विशेष योजना | २६ | १३५ | १०००००००० | ८००००० | ७०००००० | ६२००००० | ० |
| ३ | प्र.क्र.६३ कासारवाडी येथे कॉंक्रीट रस्ते करणे | विशेष योजना | २६ | १३८ | ३००००००० | ६००००० | ३०००००० | २९४००००० | ० |
| ४ | प्र.क्र.६३ मध्ये ध्यानकेंद्र, स्केटिंग ग्राऊंड व व्हालीबॉल ग्राऊंड तयार करणे. | विशेष योजना | ५४ | ३० | १०००००००० | ६००००० | ३०००००० | २४००००० | ० |
| ५ | प्र.क्र.६३ कासारवाडी आरक्षण क्र. २२ येथे मैदान तयार करणे. | विशेष योजना | ५१ | ३१ | २००००००० | १०००००० | ७०००००० | ६०००००० | ० |
| ६ | पाणीपुरवठा टप्पा १ जे.एन..यु.आर. एम.<br>पवना धरणापासून से.क्र.२३ पर्यंत थेट पाईपलाईन टाकणे. | पाणीपुरवठा टप्पा १ जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत करावयाची कामे | ५९३ | १ | ३३१११००००० | २४११४००००० | २३६७४००००० | | ४४०००००० |
| | | | | | | २४१४४००००० | २४१४४००००० | ४४०००००० | ४४०००००० |

तसेच महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय विदयुत कार्यालयाची स्थापना प्रभाग पुनरचनेअंतर्गत २६/१/२०१३ रोजी झाली आहे परंतु विदयुत कामकाजासाठी अत्यावश्यक तांत्रिक व अतांत्रिक

कर्मचारी वर्ग अपुरा मिळाला असल्याने कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. याबाबत प्रभाग समिती बैठकांमध्ये वारंवार चर्चा झाली असून प्रशासन विभागात मागणी करुन देखील आज अखेर आवश्यक कर्मचारी वर्ग नियुक्त होऊ शकलेला नाही. त्यामुळे नागरीकांची दिवाबत्तीबाबत होणारी गैरसोय टाळण्यासाठी "स्ट्रिटलाईट देखभाल दुरुस्ती व चालनाचे कामकाज" स्वतंत्र निविदा मागवून ठेका पध्दतीने दिल्यास गैरसोय दुर होणार आहे तरी फ क्षेत्रीय कार्यालयाकरीता स्ट्रिटलाईट देखभाल दुरुस्ती व चालनाचे कामकाज करणेकरीता निविदा पध्दतीने कामकाज करुन घेण्यासाठी सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात स्वतंत्र लेखाशिर्षक निर्माण करुन त्यावर महसुली अंदाजपत्रकातील पानांक ९६ अ.क्र.५ येथील स्ट्रिटलाईट विजबिले या लेखाशिर्षावरुन तरतुद रक्कम रुपये २४ कोटीतून रक्कम रुपये ५० लाख रक्कम वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई/गव्हर्नन्स-३/कावि/८२/२०१५ दि.७/८/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२१६९ दि.११/८/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत राबविलेल्या सारथी उपक्रमाच्या धर्तीवर पुणे महानगरपालिके मार्फत तशाच प्रकारचे कॉल सेंटर कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. सदरचा उपक्रम हा पुणे महानगरपालिकेमध्ये प्रथमच चालू करावयाचा असुन त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील सद्दस्थितीत चालू असलेल्या सारथी कॉल सेंटरचे कामकाज कोणत्याही परिस्थितीत विस्कळीत न होता तेथील उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व संसाधने अंशत वापरुन पुणे महानगरपालिकेचे कॉल सेंटर प्रायोगिक तत्वावर सुरु करणेबाबत परवानगी मिळणेस विनंती केली आहे. सदरचे कॉल सेंटर प्रथमत: ६ महिने कालावधीसाठी सुरु करणेसाठी तसेच ऑपरेटर्ससाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबत आयुक्त, पुणे म.न.पा. यांनी पत्रान्वये विनंती केली आहे. सदरच्या कामासाठी वापरल्या जाणा-या पायाभूत सुविधांचा अंशत वापर करुन सदरचे कॉल सेंटर सुरु करण्यास संमती मिळणेबाबत परस्पर सांमजस्य करार (MoU) पुणे महापालिकेतर्फे करण्यात येणार आहे. सदरप्रमाणे पुणे म.न.पा.चे कॉलसेंटरकरीता आवश्यक संगणक यंत्रणा, कॉल सेंटर Neon Software License Copy 6 Nos., हेडफोन,

PRI लाईन, Grievance Monitoring System इत्यादी पुणे म.न.पा.ने पुरविण्यात यावी. कॉलसेंटर साठी लागणारी जागा व सर्व्हर फक्त ६ महिने कालावधीसाठी पिंपरी चिंचवड महापालिके तर्फे पुरविला जाणार आहे. सदरची बाब धोरणात्मक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण-** मा.महापौर साहेब, याची माहिती आम्हांला सविस्तर दयावी.

**मा.महापौर -** याची महिती दयावी.

**मा.निळकंठ पोमण (संगणक अधिकारी) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी आपल्या महापालिकेला पत्र दिलेले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेत जो सारथी उपक्रम चालू आहे त्याप्रमाणेच पुणे महापालिकेस सहा महिने कालावधीसाठी आहे त्या सेटपचा वापर करुन त्यांचे सहा सीट वाढवून याठिकाणी सारथी सुरु करणेस मदत करावी त्यासाठी हा मा. स्थायी समिती मार्फत महापालिकेला विषय आलेला आहे. त्यांना फक्त सहा महिने कालावधीसाठीच दयायच आहे.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. पुणे महापालिका आयुक्त मला स्वतः:ला बोलले, आपल्या विभागाकडून त्यांनी सारथीची माहिती घेतली. आपण सारथी आणि इतर जे सेल तयार केलेला आहे तो भरपुर लॅण्डलाईनचा आहे. त्यातले आपण पन्नास टक्के वापरतो आणि पन्नास टक्के अनयुटीलाईज आहे त्याचाही वापर करनं शक्य आहे. आपले सारथी आणि ई-गव्हर्नींग डिपार्टमेंटचे काम व्यवस्थीत चालू आहे. आपले एम्प्लॉईज नेमलेले आहेत त्यांच्या शिफ्ट केलेल्या आहेत, त्यांचे टाईमींग ठेवलेले आहे ही सगळी माहिती त्यांनी घेतल्यानंतर त्यांच्याकडे ही सगळी सिस्टीम क्रिएट करण्यापेक्षा आपल्या शहराला लागून उपलब्ध आहे अशी सिस्टीम जर वापरता आलीतर ती वापरण्याचा त्यांचा उद्देश आहे. तथापि आपण महापालिकेच्या बाहेरच्या सस्थेला हे काम देतो आहोत किंवा हे काम करुन घ्यायच का नाही हा विषय असल्यामुळे तो आम्ही आपल्या समोर आणलेला आहे. त्यांचा उद्देश साधा आणि सरळ आहे. आपल्या प्राप्त मशनरीच्या मदतीने त्यांच्याकडे ही सिस्टीम चालू करावी असा त्यांचा प्रयत्न आहे त्यासाठीचा खर्च ते आपल्याला देतील. माझी महापालिका सभेला विनंती आहे की यावर एक महिना विचार करावा पण लगेच हा विषय रिजेक्ट करु नका.

**मा.मंदाकिनी ठाकरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ७३५ विषय क्रमांक - ५

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई/गव्हर्नन्स-३/कावि/८२/२०१५ दि.७/८/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२१६९ दि.११/८/२०१५

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७३६ विषय क्रमांक - ६

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. भूंजि/२/कावि/२४२/२०१५ दि.१०/८/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२१७३ दि.११/८/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेनं. २४ निगडी संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल मधील उपहारगृह इमारत पहिला मजला ५ वर्ष कालावधीसाठी लिजदराने देणे बाबतच्या ई-निविदा सुचना क्र. १/२०१५-१६ अन्वये निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर प्राप्त निविदापैकी सर्वोच्च लिजदरप्रमाणे मे.साईसेवा एंटरप्रायजेस यांचा र.रु. २७,१०,०००/- (अक्षरी- र.रु. सत्ताविस लाख दहा हजार फक्त) या प्रमाणे प्राप्त आहे. सदर मंजुर दराने ५ वर्ष कालावधीसाठी मे. साईसेवा एंटरप्रायजेस श्री.सुरेश नामदेव ढवळे यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस तसेच सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता मा.महापालिका सभेच्या उमेदमान्यतेवर ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५९९/२०१५, दि.१४/०७/२०१५

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१०४ दि.३१/७/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ” अभिनामाची ४ पदे पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६००/- या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर असून सद्यस्थितीत रिक्त असलेले एक पद पदोन्नतीने भरणेकरीता दिनांक १७/०६/२०१५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने “स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ” पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक “वैद्यकीय अधिकारी” पदावरील अधिका-याची शैक्षणीक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कलावधी इ. सेवाविषयक तपशिल पडताळून डॉ.जॉन वलसा सुनिल यांना खुला या प्रवर्गामधून “स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ” या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६००/- या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महापालिकेचे कामकाज महाराष्ट्र शासनाचे नियमाप्रमाणे चालते. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.सेवानि १८१५/ प्र.क्र. २१६/ सेवा २ मंत्रालय मुंबई दिनांक ३० मे २०१५, महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील सर्व वैदयकीय अधिकारी गट-अ यांचे सेवानिवृत्तीचे वय दिनांक ३१ मे २०१५ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने ५८ वरुन ६० करणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते. मला एक शंका विचारायची आहे की आपण डॉक्टरांची नेमणूक करतो ते फक्त वैदयकीय अधिकारी पदावरील डॉ.जॉन वलसा सुनिल आहेत या एकाचीच नियुक्ती करतो का. अशा खुप डॉक्टरांची आवश्यकता आहे. तो विषय आपल्याकडे आलेला नाही. एका डॉक्टरासाठीच विषय आलेला आहे. बाकी अनेक डॉक्टरांची आवश्यकता आहे. खुप गैरसोय होते. त्याबाबतीत विचारायचे आहे की एकाच डॉक्टराचा विषय आणलेला आहे. किती डॉक्टर कमी आहेत. डिलेव्हरीचा पेशंट घेवून गेलेतर सांगतात आमच्याकडे डॉक्टर नाहीत.

**मा.आयुक्त -** मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. आपल्याकडे डॉक्टर कमी आहेत ही वस्तुस्थिती आहे. नर्सेस, वॉर्डबॉयही कमी आहेत पण ते मानधनावर भरतोत त्यामुळे आम्ही आपल्याकडे येत नाहीत. हा डॉक्टराच्या प्रमोशनचा विषय आहे म्हणून हा विषय महासभेच्या अखत्यारीत येतो म्हणून हा विषय वैदयकीय विभागामार्फत प्रशासन आणि प्रशासन विभागामार्फत आपल्याकडे आलेला आहे.

**मा.महापौर-** उपसूचना स्विकारली आहे का.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७३७ विषय क्रमांक - ७

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/५९९/२०१५, दि.१४/०७/२०१५

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१०४ दि.३१/७/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ" अभिनामाची ४ पदे पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६००/- या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर असून सद्यस्थितीत रिक्त असलेले एक पद पदोन्नतीने भरणेकरीता दिनांक १७/०६/२०१५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने "स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ" पदावर पदोन्नती देण्यासाठी अर्हताधारक "वैद्यकीय अधिकारी" पदावरील अधिका-याची शैक्षणीक अर्हता, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, आरक्षण व अनुभव कलावधी इ. सेवाविषयक तपशिल पडताळून डॉ.जॉन वलसा सुनिल यांना खुला या प्रवर्गामधून "स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ" या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६००/- या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच महापालिकेचे कामकाज महाराष्ट्र शासनाचे नियमाप्रमाणे चालते. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.सेवानि १८१५/ प्र.क्र. २१६/ सेवा २ मंत्रालय मुंबई दिनांक ३० मे २०१५, महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील सर्व वैदयकीय अधिकारी गट-अ यांचे सेवानिवृत्तीचे वय दिनांक ३१ मे २०१५ पासुन पुर्वलक्षी प्रभावाने ५८ वरुन ६० करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७३८ विषय क्रमांक - ८

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.अरुण बो-हाडे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.१०६ दि.३१/७/२०१५

मा.महापालिका सभा ठराव क्रमांक २८१२ दिनांक २०/०८/१९९४ अन्वये डॉ.एस.एस. गोरे, पशुधन विकास अधिकारी यांची सेवा सार्वजनिक हितासाठी महानगरपालिका अस्थापनेवर विलीन करणेत आलेली आहे. पशुवैद्यकीय विभागामध्ये " पशुवैद्यकीय अधिकारी " १९९८ पासून महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग-२ या श्रेणीमध्ये "शाखाप्रमुख" म्हणून कार्यरत आहेत. पशुवैद्यकीय अधिकारी यांचा खाजगी दवाखाना नाही अथवा ते खाजगी व्यवसाय करीत नसल्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील सर्व मेडिकल ऑफिसर्स यांना ज्याप्रमाणे व्यवसायरोध भत्ता दिला जातो त्या प्रमाणे नियमांनुसार पशुवैद्यकीय अधिकारी यांना व्यवसायरोध भत्ता सध्या देण्यात येत आहे आणि या पुढे देखील व्यवसायरोध भत्ता देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - मा.माया बारणे यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे डॉ.गोरे यांनी द्यावीत.

**मा.डॉ.गोरे** **(पशुवैद्यकीय अधिकारी)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, महापालिका हद्दीत मोकाट जनावरांसंदर्भात मोकाट कुत्री पकडण्यासाठी आपल्याकडे सहा प्रभागांत दोन संस्था कार्यरत आहेत. सप्टेंबर पासून तीन संस्था कार्यरत होतील. दोन संस्थांच्या माध्यमातून गेले २ वर्षात ४५,२४८ इतक्या कुत्र्यांवर नसबंदीची शस्त्रक्रिया झालेली आहे. मोकाट कुत्र्यांसदर्भात कामाचे नियोजन कसे असावे, त्यासाठी केंद्र शासनाच्या राजपत्रात काही एबीसी रुल्स आहेत. त्याच्या अनुषंगाने सध्या कामकाज करावे लागते. अन्य महापालिका यांच्या तुलनेत आपण आत्ता ३ केंद्रे सुरु करत असून नजिकच्या काळात मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यात आपल्याला यश येईल. महालेखाकार, मुंबई यांचे ऑडीट झाले त्यातही त्यांनी सूचना दिली आहे की, बर्थकंट्रोल हे मास लेव्हलवर राबवायचे आहे, तरच त्याचा परिणाम दिसून येऊ शकेल. जी मोकाट कुत्री, मोकाट जनावरे आहेत. ती रस्त्यावर येण्याचे प्रमाण पावसाळ्यात जास्त असते. आपण आऊटसोर्सिंगच्या पद्धतीने अशा प्रकारचे प्राणी पकडणारे जे स्किल्ड लोक आहेत. त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून आऊटसोर्सिंग पद्धतीने प्रायमरी बेसवर कोटेशन कॉल करुन नजिकच्या काळात हा प्रॉब्लेम सॉल्व्ह होईल. त्यासाठी एका स्वतंत्र मंडळाचे नियोजन करण्याचा प्रस्ताव आपण ठेवलेला आहे.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, इंजेक्शन देऊन त्यांचे प्रॉडक्शन बंद करुन टाका नाहीतर लोकांना रात्री झोप येत नाही.

**मा.डॉ.गोरे** **(पशुवैद्यकीय अधिकारी)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, एबीसी रुल्समध्ये सर्व सशक्त कुत्र्यांवर शस्त्रक्रिया करण्याची जी कार्यपद्धती ती चालू आहे. जे मानवी आरोग्यास अपायकारक आहेत अशा कुत्र्यांची समितीच्या माध्यमातून निर्णय घेऊन मानवी पद्धतीने विल्हेवाट लावण्याची कारवाई चालू आहे.

**मा.झामाबाई बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, प्रत्येक वेळी आपण ही चर्चा करतो. प्रत्येक जण आपआपल्या वॉर्डातील कुत्र्यांवर ऊहापोह करतो. पण त्यांचा काहीच उपयोग होत नाही. कारण अधिका-यांच्या पलिकडची ती कुत्री आहेत. कुत्री पकडणारी गाडी दिसली की कुत्री लपून बसतात. मग अधिका-यांना अशी टोलवाटोलवीची उत्तरे द्यायला त्यांना पर्याय रहात नाही. आत्ता डॉ.गोरे साहेबांनी उत्तर दिले. प्रत्येक वेळी आपण उत्तर ऐकत असतो आणि त्याला काहीच पर्याय नसतो. आत्ता त्यांनी कुत्र्यांचा, मोकाट जनावरांचा उल्लेख केला. परंतू खाजगी जागा आहेत, त्या जागेत डुकरे मोकळी सोडलेली असतात. मोठी झाली की ती घेऊन जातात. याचा शेजारच्या लोकांना त्रास होतो. आजुबाजूला घाण वास येतो. खाजगी जागेत डुकारी आणून सोडतात, त्यांच्यावर काय कारवाई करणार आहोत. जशी कुत्री लपतात तशी डुकरे पण लपून बसतात का? यावर काहीच कारवाई होत नाही. प्रत्येक जण त्याच्या प्रभागात या विषयावर बोलतो. पण त्यावर काहीच उपाय केला जात नाही. गुंड कसे ग्रुप करुन चालतात, तसा या कुत्र्यांचा घोळका असतो. ते ग्रुप करुन चालतात. याचा आम्हाला खूप त्रास होतो. हे लक्षात घेऊन कारवाई करण्यासारखे आहे. फक्त मिटींगमध्ये बोलायचे आणि त्यावर काहीच कारवाई नाही. आयुक्त साहेब, यावर कारवाई झाली पाहिजे. मला ऐवढेच बोलायचे आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, कुत्री, मोकाट जनावरे व डुकरे या विषयावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. एक दिवस या विषयासाठी सेपरेट सभा भरली तरी दिवसभर सगळे नगरसेवक त्यांच्या वेगवेगळ्या भावना व्यक्त करतील. कुत्र्यांचा व या मोकाट जनावरांचा सगळ्या नगरसेवकांना जो रोग लागला आहे असे म्हटलेतरी चालेल. प्रत्येक नगरसेवकाच्या वॉर्डात, प्रत्येक प्रभागात रोज काही ना काही चांगले वाईट प्रसंग घडत असतात. मनेका गांधी यांचा जो निर्णय आहे, मला त्याच्या विरोधात जायचे नाही. डॉ.गोरे यांनी सांगितले, सहा प्रभागांत दोन युनिट आहेत. आणखी चार उपलब्ध करणार आहोत. यात एवढे दूर्लक्ष का. मा.माया बारणे यांनी आतमध्ये वस्तू आणली होती. त्यांनी सभागृहात सोडायला डुकरे आणली होती ती माझ्याकडे दिली असती तर ती मी सभागृहात सोडली असती. डॉ.गोरे बिचारे एकटे काय करणार. आपण डॉक्टर साहेबांना टिम उपलब्ध करुन देत नाहीत. कुत्री पकडण्यासाठी आपल्याकडे लोकं उपलब्ध नाहीत. हे लोक आलेतर कुत्री सापडत नाहीत. आम्ही नागरीकांना सांगतो, कुत्री घरांत कोंडा. २/२ तास राहत्या घरात कुत्री कोंडली आहेत. एखाद्याने फोन केल्यावर कुत्री पकडायला सहा तासांनी गाडी येते. यांचे लोक

तिथे जात नाहीत. आपले ६ प्रभागांत कमीत कमी एका प्रभागात एक/दोन युनिट दिले पाहिजेत व कुत्री पकडणारी गाडी. त्यांच्याबरोबर कामगार दिले पाहिजेत. आपल्याकडे १/२ कामगार असतात. ते कुत्री पकडायला गेले की कुत्री सापडत नाहीत. ते सगळीकडे फिरते. मोकाट रानात ते सापडत नाहीत. त्यांचे शासन आहे. कुठेही जा तुम्हाला १०/२० कुत्री कुठेही दिसणार. त्यांचा बंदोबस्त करा. अन्यथा आज सभागृहात मा.माया बारणे यांनी जे केले आहे, ते पुढील वेळी मी सभागृहात प्रत्यक्षात आणून कुत्री आणू  जनावरांसाठी जसा कोंडवाडा असतो. डॉ.गोरे यांनी सांगावे, रस्त्यावरील मोकाट जनावरे आहेत. त्यांना मालक नाही. त्यांच्यावर कारवाई करताय असे वाटत नाही. अनेक ठिकाणी पिंपरी चिंचवड शहरात जनावरे रस्त्यात येऊन बसतात. त्यासाठी आपल्याकडे काय यंत्रणा आहे. तर शून्य. ज्यावेळी आपण शहराला बेस्ट सिटी असे सांगताय. जर माझ्या पायाला जखम झाली असेलतर आपण लगेच ऑपरेशन करत नाही. आत्ता अशी परिस्थिती झाली आहे की, माझ्या पायाचे दुखणे झाले आहे. आणि तुम्ही ऑपरेशन डोक्याचे करताय. तुम्ही प्रॉपरली काम करा. मी काल सुद्धा ऑटोक्लस्टरमध्ये सांगितले होते की, तुमच्या कामाची पद्धत प्रॉपर नाही. डॉ.श्रीकर परदेशी यांचे खरेतर तुम्ही गुण घ्या. तुमची भूमिका कडक ठेवा. त्यामुळे अधिकारी सूस्त झाले आहेत. आत्ताच पक्षनेत्यांनी सांगितले आहे की, अधिकारी तुमच्या मिटींगमध्ये झोपतात. यापेक्षा निंदनीय बाब नाही. परदेशी साहेबांच्या काळात अधिका-यांना रात्री सुद्धा झोप येत नव्हती. उद्या काय घडेल याची दहशत, भिती अधिका-यांना बसली होती. ते काम करत नसतील तर परिस्थिती गंभीर होईल.

आम्ही ग्रामिण भागातून आलो आहोत. प्रत्येक घरात दोन/चार पाळीव जनावरे  आहेत. गाई म्हशी बैल असतील. या जनावरांसाठी आमचा सरकारी दवाखाना होता. आमची जनावरे जर आजारी पडली तर आज आमच्या भागात त्यांच्यासाठी महापालिकेचा दवाखाना नाही. आजपर्यंत दवाखाना उपलब्ध नाही. मी २००७ पासून ओरडतोय. पूर्वी जिल्हा परिषदेचा दवाखाना होता. तो हँडओव्हर केला. त्या डॉक्टरांना बोलवायचे म्हटले तर ५ ते १० हजार रुपये घेतात. आमच्या एखाद्या जनावराचा अपघात झालातर आम्हाला औंध इथे जावे लागते एवढी मोठी श्रीमंत महापालिका. जनावराला काय झाले, मोडले तोडले तर त्याला दवाखाना कुठे आहे. हा विषय गंभीर आहे. आयुक्त साहेब, आपण हे लक्षात घेतले पाहिजे. या विषयावर अनेक वेळा चर्चा केली आहे. अनेक ठिकाणी अशी जनावरे आहेत. शेतात काम करताना, कुठल्या कामासाठी जनावरं लागत असेल. अशा जनावरांसाठी आम्हाला दवाखाना उपलब्ध नाही. पूर्वी चार्ज द्यावा लागत नव्हता. आता बाहेरून डॉक्टर आणून त्याला चार्ज द्यावा लागतो आहे. अशा माध्यमातून काय निर्णय घेणार आहोत याचे उत्तर द्यावे. व्यवसाय करणारी डुक्करे, कुठेतरी कानाकोप-यात दिसली. चिखलीच्या बाजूला इथे व्यवसाय चालला आहे. डुकरांना खायला आणून टाकतात. त्यांना तिथे मोठे करतात. मी अनेक वेळा सांगितले आहे. त्यांना

तिथून घेऊन जा. त्यांना काढायला लावा. आपली माणसे चार वेळा जातात, तिथे काही होत नाही. मालकाला दंड करा. त्याच्यावर कारवाई करा. हे लोक धंदा करतात, विक्री करतात. अशा लोकांवर सुद्धा कडक कारवाई करा असे डॉ.गोरे यांना नाव पत्ता देऊन सांगितले होते. त्यांनी काय कारवाई केली. कारवाई केली नाही. कडक कारवाई केली नाहीतर ते अजून धंदा करायला मोकळे होतील. आम्ही तुम्हाला मदत करतोय. नाव पत्ता सांगतोय. तरी सुद्धा कारवाई करत नसतील तर यापेक्षा वेगळी बाब काय आहे. आयुक्त साहेब, म्हणून मी तुम्हाला सांगितले की, तुम्ही कुठेतरी त्यांचा गुण घ्या. मी सभागृहाच्या वतीने कळकळीची विनंती करतो की, तुमच्या अधिकारांचा वापर करा. आपण या अधिका-यांना पगार देतोय. सर्वसामान्य माणूस पै-पै कमवून देतो. त्यांच्या जीवावर तुमच्या पगार होतो आहे. त्यांच्या व्यथा आम्ही तुमच्यापर्यंत आणून देतोय. तुम्ही त्यांना दोन तास द्या. का आदेश देत नाही. कडक आदेश दिलानाहीतर ते असेच चालणार आहे. कुठेतरी सभागृहात चालवले तरी काहीच होणार नाही. याचे आऊटपुट घ्या. ८ दिवसांत याचे आऊटपुट आले पाहिजे. काय काम केले, तुमच्यापर्यंत याची माहिती आलीच पाहिजे. हे केलेत तर हे शहर सुरळीत चालेल. त्यासाठी या पायाभूत सुविधा देणे गरजेचे आहे. या मोकाट जनावरांसाठी जसे पूर्वी ग्रामिण भागांत कोंडवाडे होते, तसे कुठेतरी जागा असेल,गायीरानांतील आरक्षणे आहेत तिथे यांच्यासाठी मोठे कंपाऊंड करा. त्यांना मारा असे आम्ही म्हणणार नाही. त्यांना कुठेतरी वेगळे ठेवा. नसबंदी किती करणार आहात. ते करायला देखील त्यांना स्टाफ उपलब्ध करुन द्या. महापालिकेचे लोकं कधी फोन केलातर घेत नाहीत. ते येत नाही. म्हणून आपली सुद्धा टिम कार्यरत असावी. आपले ६ जण असतील तर त्यांचे सुद्धा ३ ठेवा. पूर्वी असे होते. पूर्वी महापालिकेचे कर्मचारी कुत्री पकडण्यासाठी होते. सगळ्या वॉर्डांत हाच विषय आहे. आम्हाला कुत्री पकडणारी गाडी कुठेही दिसली नाही. निगडी नाक्याच्या अलिकडे एक्सप्रेस-वे ला आलोतर तिथे रात्री अपरात्री एखादा स्पीडने आलातर तिथे अपघात मोठी मनुष्यहानी होऊ शकते. रात्री रस्त्यात बसलेली जनावरे दिसत नाहीत. सगळीकडे अशीच परिस्थिती आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, यावर नियंत्रण करा. डॉ.गोरे यांना जमत नसेलतर तिथे दुसरा एखादा अधिकारी बसवा व यांना ॲडीशनल चार्ज द्या. किंवा त्यांना सेपरेट मनुष्य द्या. सरकारी दवाखान्याबाबतीत तुम्ही काय करणार याचा खुलासा करा.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, वॉर्डात कुत्र्यांबाबतीत इतकी गंभीर परिस्थिती आहे. मला नागरीकांचे फोन येत असतात. कुत्र्यांना आजार झालेले आहेत. ते लोकांच्या चपला, कपडे उचलून नेतात. रस्त्यावरची घाण सुद्धा लोकांच्या दारात आणून टाकतात. रात्री जिन्यात, गॅलरीत येऊन बसतात. बंद पडलेल्या गाड्या आहेत, तिथे त्यांची पिल्ले असतात. मी डॉ.गोरे यांनी सांगितले तर ते म्हणतात हे काम संस्थेला दिले आहे. पण या संस्थेच्या कुत्री पकडणा-या गाड्या वॉर्डातून कधी फिरतात, कुठे

फिरतात. आम्ही ज्या तक्रारी सांगितल्या तिथून त्यांनी कुत्री उचलली का मग हे सुद्धा सांगितले नाही. आम्ही त्यांना नंबर देतो. त्यांनी आम्हाला येऊन भेटले पाहिजे. आम्ही वॉर्डातली तक्रार दिली. त्या तक्रारीची तुम्ही माहिती दिली पाहिजे. सदस्य कुत्र्यांबद्दल वारंवार बोलत असतात. मग वॉर्डातली किती कुत्री पकडली, गाडी फिरली का हे सुद्धा सांगितले गेले पाहिजे. भविष्यात यावर विचार होईल अशी आशा करते.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू, महापौर साहेब, तुम्ही आणि मी ज्या वॉर्डाचे प्रतिनिधित्व केले आहे, त्या वॉर्डात कुत्र्यांवर अभ्यास करणारी तज्ञ मंडळी राहतात. यापूर्वी डॉ.गोरे यांना माहिती आहे की, वैदू समाज हा माणूस जसे लहान मुलावर प्रेम करतो तसे कुत्रे जन्मल्यापासून मरेपर्यंत हा समाज कुत्र्यावर प्रेम करतो. तुम्ही ही महापालिका त्यांचा आदर्श घेऊ शकता. तुम्ही युपी, बिहारचे लोकांना बोलवतो, संस्था नेमताय, अडाणी मराठी माणसाला त्यांच्या बोलण्यातला एक शब्दही कळत नाही. ते गॉटमेट करतात आणि निघून जातात. कुत्री पकडायचे बाजूलाच राहते. १९८४ पासून मी या शहरात आहे. ग्रामपंचायत काळापासून वैदू समाज इथे आहे या समाजाची काही मुले डॉ.गोरे सरांकडे मानधनावर कुत्री पकडायचे चांगले काम करत होती. ते बंद करायला लावले. मी प्रभाग मिटींगमध्ये सांगितले होते. शंभर यूपी, बिहारी मुले एका बाजूला आणि माझा वैदू समाजाची मुले एका बाजूला ठेवा. जास्त कुत्री कोण पकडतो ते सगळ्यांसमोर येईल. हे सभागृहासमोर असेलतर लाखो रुपये वाया घालवण्यापेक्षा शहरातील मुलांना संधी दिलीत तर, कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर संधी निर्माण करुन दिलीतर आत्ता नगरसेवक जे ओरडतात ते कुठेतरी ओरडणार नाहीत. जी माणसे ख-या अर्थाने कुत्री सांभाळतात. कुत्र्यांचा जन्ममृत्यू ज्यांना कळतो.

**मा.महापौर** - दुस-यांवर टिका करु नका.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मी टिका करत नाही. आपल्या शहराचा पैसा वाया जातो आहे. ही संस्था काही काम करत नाही. असे माझे म्हणणे आहे म्हणून मी उल्लेख करतोय. आपल्या शहरात या समाजाचे लोक सक्षम आहेत. चांगले काम करु शकतात. आपण याचा विचार करा. पन्नास ते शंभर मुले किती लागतील ती मी आपल्याला देतो. आपण यांना काम करायला संधी द्या. पिंपळे गुरवमध्ये जनावरांसाठी सरकारी दवाखाना होता. ड प्रभागात आजही जवळजवळ शंभर ते पंच्याहत्तर टक्के लोकांकडे गाय, म्हशी, बैलगाड्यांचे बैल, शर्यतीचे बैल आहेत. त्यांना जनावरांची आवश्यकता आहे. कुठेतरी सेंट्रलाईज दवाखाना केलातर त्या भागातील लोकांची सोय होईल. मी बिहारचा उल्लेख केला असेल परंतू मी वैतागलो आहे. आपल्या २ संस्था आहेत, त्या निष्फळ आहेत. ते फोन उचलत नाहीत. कॉन्टॅक्ट केलातर भेटत नाहीत. त्यांच्यापासून नगरसेवकांना अडचण आहे. वारंवार फोन करुन नगरसेवक त्यांच्याकडून जी अपेक्षा करतात. ती अपेक्षा पूर्ण होत नाही. म्हणून मी हा दुसरा मार्ग सांगितला आहे

आपल्याकडे लोक आहेत त्यांचा विचार करा. त्यांचा उपयोग करुन घ्या. त्यांच्याकडून चांगल्या पद्धतीने काम होईल एवढी शाश्वती मी देतो.

**मा.आर.एस.कुमार-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, प्रथम डॉ.गोरे यांच्याकडून कुत्री पकडायचे काम काढून घ्या. डॉ.गोरे ऑपरेशन करणार का, ओपीडी चालवणार का कुत्री पकडायचे काम करणार. हे यांचे काम नाही. मी मागेदेखील आयुक्त साहेबांना हेच सांगितले होते. डॉग स्कॉड बदलायचे काम फुल टाईम, तुम्ही या कामासाठी फुल टाईम अधिकारी अपॉईंट करा. १५/१५ फोन येणार. एक डॉक्टर हे करु शकणार नाही. हे काम त्यांच्याकडून काढून घ्या व आरोग्य विभागातील एखाद्या असिस्टंट आरोग्य अधिका-याला हे काम द्या. Dr.Gore cannpt give full time to this job. वॉर्डात १०/१० कुत्री असतात. मी रोज वॉर्डातील सॅनिटरी इन्स्पेक्टरला फोन करतो. पूर्वी फोन केला की कुत्री घेऊन जायला गाडी यायची. आत्ता तसे होत नाही. का होत नाही माहित नाही. लोक आमच्यावर नाराज आहेत. एकदा, दोनदा सांगितले तरी काम मात्र होत नाही. त्यामुळे कुत्री पकडायच्या कामाबद्दल महापालिका सभेमध्ये बोलावे लागते. हे अतिशय लाजिरवाणे आहे. नवीन विभाग करुन आरोग्य अधिकारी, एक सॅनिटरी इन्स्पेक्टर यासाठी अपॉईंट करा. अधिकारी दिलातर त्याला टाईम बाऊंड करा. फक्त प्रभागाला एक गाडी द्या. यांना एक सेंट्रल कोंडवाडा करा. आपल्याकडे काय करतात, कुत्री पकडतात, घेऊन जातात व परत वॉर्डात सोडून देतात. काय उपयोग आहे. म्हणून आयुक्त साहेबांना विनंती आहे की, हे काम करण्यासाठी सेपरेट अधिकारी द्या. त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर द्या. आणि या कामाला सुद्धा महत्व द्या.

**मा.माया बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आत्ता डॉ.गोरे यांनी जी माहिती दिली. अक्षरशः सभागृहाची फसवणूक करत आहेत ते वर्षानुवर्षे एकाच विभागात काम करतात, तरी त्यांना व्यवस्थित माहिती देता येत नाही यासारखी शोकांतिका नाही. डॉ.गोरे यांना एक कुत्रं पकडण्यासाठी ८/१० फोन करावे लागतात. नाईलाजास्तव अर्वाच्य भाषा वापरावी लागते. असे काम असेलतर प्रशासनाचे खूपच अवघड आहे. माझ्या प्रभागात अतिशय वाईट अवस्था आहे. तिथे डुकरांचे इतके प्रमाण आहे. मघाशी मी त्यातलीच दोन डुकरे सभागृहात आणली होती. पण आपल्या सिक्युरीटींनी मला ती आणू दिली नाहीत. एक वयोवृद्ध महिला तिच्या नातींसह एका घरात राहते. डुकरे तिच्या घरात घुसून बसली होती ती पाच-पाच सहा-सहा तास जागेवरुन हलली नाहीत. इतकी मोठी डुकरे आहेत, ती घराबाहेर पडल्यावर अंगावर धावून येतात. अन्न भाज्यांची नासधूस करतात. लोकांना जीव मुठीत घेऊन वावरावे लागते आहे. याला कोण जबाबदार आहे. जे डुकरे पाळतात, ती व्यवसाय करतात, आम्हाला कोणाच्याही पोटावर पाय द्यायचा नाही. त्यांनी खुशाल व्यवसाय करावा. परंतू कमीत कमी नागरीकांना त्रास होऊ नये याची दखल त्यांनी घेणे गरजेचे आहे. यावर प्रशासनाचा अंकुश असला पाहिजे. आम्ही हजारवेळा अधिका-यांना फोन करतो. लोकांना बोलवतो. पण यातून

काही आऊटपुट निघत नाही. आयुक्त साहेब, काहीतरी निर्णय घ्या. जेणेकरुन हे शहराच्या दृष्टिकोणातून उपयुक्त असेल पाहीजे.

**मा.आशा शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, स्थायी समिती सभेचे मिनिटस् ठेवले पाहिजेत मी स्थायी समितीमध्ये किमान दहा वेळा तरी या विषयावर चर्चा केली आहे. मी स्थायी समितीची सदस्या असताना मा.माया बारणे ताईदेखील माझ्याबरोबर होत्या. आत्ता मा.माया बारणे म्हणाल्या की, डॉ.गोरे यांनी चुकीची माहिती सांगितली आहे. मी त्यांना दोषी धरत नाही. ते ज्या पद्धतीने काम करतात. मग त्यांनी हे केले नाही,ते केले नाही. हा नाहीचा पाढा वाचण्यापेक्षा तुम्हीच २ वर्षांपूर्वी सांगितले होते की, आपल्याकडे २ महिन्यांत नविन युनिट येते आहे. २ वर्षे म्हणजे २ महिने हि तुमची संकल्पना आम्हाला सुद्धा सांगा. म्हणजे आमची ५ वर्षे म्हणजे किती वर्षे पुढे आमचे पद राहिले आहे ते आम्हाला सुद्धा कळेल ज्या गोष्टी आपण बोलतो, नगरसेवकांना सांगतो, यावर आपण किती ठाम आहोत याचा एकदा पाठपुरावा करा. आपण ६ प्रभागांना ६ गाड्या देणार. ६ प्रभागांना ६ संस्था देणार यावर बोलणे झाले होते. या गोष्टीला दीड वर्ष झाले आहे. डॉ.गोरे किंवा प्रशासन देखील यावर बोलत नाहीत. तुमच्याशी झालेले हे संभाषण आहे. जेव्हा कुत्रे अंगावर येते तेव्हा काय अवस्था होते ते पहा. तुम्ही गाडीतून फिरता म्हणून तुम्हाला त्रास भोगावा लागत नाही. पण आम्ही प्रभागात नगरसेवक म्हणून जेव्हा फिरतो, तेव्हा लोक आमच्या अंगावर येतात. आम्हाला नागरीकांना उत्तर देताना लाज वाटते. होईल, बघू. कुत्री इतकी क्वालिफाईड आहेत की, तुमची गाडी आली की धूम पळतात. त्यांना एकही कुत्रे सापडत नाही. आम्हाला त्यांना सांगावे लागते, थोडं १० मिनिटे थांबा एक तरी कुत्रं पकडा, चक्क या भाषेत बोलावे लागते. कुत्री रात्री सापडतात. त्यांच्या मानसिकतेचा थोडातरी अभ्यास करा. आपल्याला रिझल्ट पाहिजे असेलतर ती आपल्याल्या कधी मिळतील. त्यासाठी काहीतरी पर्यायी व्यवस्था केली पाहीजे. त्यांना खायला बिस्कूट दिले पाहिजे. ते बेशुद्ध पडले पाहिजेत. कुत्र्यांना ती बिस्किटे खायला घाला. तुम्हाला लोकं सहकार्य करतील. तुम्ही कसलाही बदल करत नाहीत. शासन निर्देशानुसार आपण सगळ्या गोष्टी बोलतो. पण काहीतरी पर्याय शोधला पाहिजे. कुत्री मारु नका असे त्यांचे मत आहे तसे आमचेही मत आहे. पण त्याला किमान काहीतरी पर्याय शोधा. आमच्याकडे १०/१२ कुत्री कशीबशी पकडली गेली आहेत. आणि गावात ५०/१०० कुत्री आली आहेत. आम्ही सभागृहात ओरडतो, नकारात्मक भूमिका घेऊन बोलतो असे अजिबात नाही. आम्हालाही पॉसिटीव्ह काम करणारी लोक आवडतात. आज डॉ.श्रीकर परदेशी नसताना त्यांचे नाव सभागृहात आजही तितक्याच आदराने घेतले जाते. कारण त्यांचे काम तसेच होते. रिझल्ट दिसला तर आम्हालाही तुमचे कौतुकच करायचे आहे. असे कुठेही होताना दिसत नाही. आयुक्त साहेब, तुम्ही कुठेतरी तुमच्या भूमिकेशी ठाम राहीले पाहिजे रात्रीच्या वेळी कुत्री सापडतात. ती एका ठिकाणी बसलेली असतात. त्यांना स्मेल परफेक्ट माहित असतात. त्यामुळे गाडी आली

की ते लगेच निघून जातात. मग आपण रिझल्ट कसे देणार. डॉ.गोरे कुत्री कशी, कुठे मिळतात. ते नसबंदी कशी करतात. डॉक्टर साहेबांनी एका वर्षात अडीच हजार ऑपरेशन्स केली असे ते सांगतात. पण आमच्याकडे हार्डली १० कुत्री सापडली आहेत. यावर कुठेतरी फायनल डिसीजन घ्या. मा.महापौर साहेब, आयुक्तांनी यावर काय कारवाई केली हे सभागृहासमोर पुढील वेळी सांगावे अशी विनंती करते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य, प्रशासनाला लाज वाटली पाहिजे. अशा विषयावर इतके वेळ बोलतोय ही लाजिरवाणी गोष्ट आहे. आपले लोक किती कार्यक्षम आहेत ते पहा. मुळात हा सदस्य प्रस्ताव आहे. कोणताही सदस्य त्याच्या मनाने सदस्य प्रस्ताव करत नाही. अधिकारी इतरांशी तुलना करत असतील तर कशासाठी त्यांना सुविधा द्यायच्या, का द्यायच्या. कुत्र्यांवर आणि डुकरांवर बोलण्यासाठी सभागृह आहे का. या गोष्टी आम्ही सांगितल्याच नाही पाहिजेत. अत्यावश्यक सेवेत या गोष्टी आहेत. एक काम अडीच वर्षांपूर्वी सांगितले होते. यांचे एकच उत्तर, संस्था बघतोय. यांना सस्पेण्ड करा. ते एक काम करू शकत नाहीत. अतिशय घाणेरडी परिस्थिती आहे ती इथे बोलतो होते त्यांना लाज वाटली पाहीजे. २/२ वर्षांत डुकरे पकडून आणू शकत नाहीत. भूतकाळात मा.खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी डुकरे आणून सभागृहात सोडली होती त्यांच्याच थेरगावातील नगरसेविका बारणे ताई दुसऱ्या आहेत. या विभागाला काम करताना काहीतरी लाज वाटली पाहिजे. डॉक्टरांक़डे लोक असो नसो, आपण यांना सुविधा देणार असूतर त्यांना कामाची जबाबदारी समजली पाहीजे. या ठरावात लिहीले आहे की, ते खाजगी प्रॅक्टीस करत नाहीत. त्यांचा दवाखाना नाही. त्यांचे सगळे उद्योग इथेच चालतात. हे लोक डुकरे न पकडायचे पैसे घेतात. व्हिप मध्ये हा विषय मंजूर आहे. पण माझा या विषयाला विरोध आहे. हे लोक अशा पद्धतीने काम करत असतील तर अशा लोकांना कुठेतरी शासन सुद्धा झाले पाहिजे. हा प्रश्न कोणत्या पक्षाचा नाही. सर्वपक्षीय लोक इथे बोलले आहेत. हे स्वतःला विभाग प्रमुख म्हणतात मग त्यांना त्यांची जबाबदारी कळाली पाहिजे. अशा विषयावर कशासाठी सभागृहाचा वेळ घालवायचा. ते खुशाल स्पष्टिकरण देत बसले आहेत. इतर महापालिकांशी तुलना करता, आपल्याकडे हे नाही, ते नाही. ही महापालिका महाराष्ट्रामध्ये सगळ्यात चांगली आहे हे सांगा. ते करु शकत नाहीत. त्रुटी प्रशासनाच्या कामकाजात आहे, आपल्या लोकांमध्ये आहे. हि व्यवस्था नाही, ती व्यवस्था नाही काही कारण सांगायचे नाही. बाकी चांगल्या कामांत तुलना होत नाही मग यात कसे कळते. जेव्हा अतिरेक होतो, त्या वेळीच या तक्रारी येतात. आपल्या शहरात प्राण्यांचे अतिक्रमण होत असेल तर मात्र हिच लोकं जबाबदार आहेत. सांगवीतील उदाहरण देतो. सांगवीत ड्रेनेज लाईन आहे. डुकरी पाळणारे लोक या ड्रेनेज लाईन फोडतात. हे सांगितले नाही तर मी हे दाखवून दिले आहे. हे सगळीकडे आहे. जिथे जिथे नदीचे चेंबर आहेत तिथे चेंबर फोडून डुकरांना बसण्यासाठी जागा करून दिली जाते. हे घाणेरडे पाणी नदीमध्ये

डायरेक्ट जाते. मग एमपीसीबी आपल्याला नोटीस देणार, आपल्याला दंड बसणार. कारण काय तुम्ही एसटीपीतून पाणी नदीत सोडत नाही. कोणती गोष्ट कुठे जाते. आपली नदी घाण करायला हे लोक कारणीभूत आहेत. मग यांच्यावर कडक शब्दांत कारवाई करायची असो. शो कॉज द्या. यांनी रिझल्ट दिला नाहीतर नुसतेच सभागृहात डुकरे सोडून काही होणार नाही त्यांच्या घरांत सोडली तर कमी होतील. त्यांना सुविधा अवश्य द्या. कोणी कामचुकारपणा करत असतील तर त्यांना शिक्षा द्या. चांगले काम केलेतर बक्षिस सुद्धा द्या. आमच्यासमोर ज्या पद्धतीने मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवला आहे तो शंभर टक्के चुकीचा आहे आपण यांना सगळे देतोय. सगळे आहे. आत्ता आमच्या मा.आर.एस.कुमार यांनी सांगितले की,त्यांना ऑपरेशनमधून वेळ मिळत नाही. प्रायव्हेटमधील लोक सुद्धा त्यांच्याकडेच ऑपरेशन करायला जातात. त्यांना विचारा. ज्यांना प्राण्यांची आवड आहे. आम्हाला सुद्धा प्राण्यांची आवड आहे, आम्ही काय त्यांचा द्वेष करत नाही. हे लोक डॉक्टर गोरे यांच्याकडे जातात. प्रायव्हेट दवाखान्यांचे प्रमाण फार कमी आहे. त्यामुळे त्यांच्याकडे मुळातच गर्दी असते सगळे मालामाल चालले असेल तर कशाला खाजगी दवाखाना काढतील. माझा स्पष्ट आरोप आहे, त्यांना सांगितलेले काम, नागरीकांच्या अडचणी ते दूर करत नाहीत त्यांच्याबाबतीत तुम्ही विचार करावा. आणि ज्या-ज्या तक्रारी नगरसदस्यांनी सांगितल्या आहेत, ते काम करुन घेणे आयुक्त म्हणून, प्रशासक म्हणून आपले राहील.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, चर्चा भरपूर झाली आहे. मला वाटते, आयुक्त साहेब, यात काही योग्य निर्णय घ्यायचा तो ताबडतोब घ्यावा. याठिकाणी मा.आर.एस.कुमार यांनी जो उल्लेख केला होता. डॉ.गोरे यांचा विषय आहे. डॉ.गोरेंविषयी मला व्यक्तिगत विचारले तर मी सांगेत की, डॉ.गोरे अतिशय चांगले डॉक्टर आहेत याबद्दल काही दुमत नाही. परंतू त्या माणसाला तुम्ही जी ताकद पाहिजे ती देणार नसाल, जी यंत्रणा पाहिजे ती देणार नसाल तर तो माणूस काम करु शकत नाही. त्यांनी ऑपरेशन बघावे, कोणाचा पर्सनल कुत्रा असेल तर कोणती ब्रीड आहे,काय आहे ते बघावे. त्यांना नॉलेज भरपूर आहे. हा सन्मा.सदस्यांचाच प्रस्ताव आहे, त्यांना अमुकअमुक भत्ता देण्यात यावा. सन्मा.सदस्यांनाच असे वाटते की त्यांना काहीतरी मदत करावी. आणि मग दुसरीकडे आपणच त्यांच्याविषयी अपशब्द बोलावे किंवा त्यांना गैरजबाबदार धरणे हे योग्य वाटत नाही. माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण सर्वांनी मिळून हा कुत्र्यांचा उपद्रव कसा कमी होईल, यासाठी काय यंत्रणा राबवावी लागेल. तुम्हाला वेळप्रसंगी मानधनावर काही लोक घ्यावे लागतील. विशेषतः वडार,वैदू समाजाचे लोक आहेत. ते यात पटाईत असतात. त्यांना माहित असते, कसे पकडायचे. त्यांना मानधनावर घ्या. यांचा ताबडतोब बंदोबस्त कसा होईल ते पहा. त्यांना एकदा घेऊन बघा. त्यांना एक चांगला अधिकारी द्या. वास्तविक त्यांना पैसे खर्च करायचा अधिकार नसेल, यंत्रणा राबवायचा अधिकार नसेल, बाकी सुविधा देण्याचा अधिकार नसेल तर

मला वाटते डॉ.गोरेंसारख्या अधिका-याला उगाच नावं ठेवण्यात अर्थ नाही. त्यांना प्रशासनाकडून जी मदत लागते ते देण्याचे काम, विशेषतः वडारी, वैदू समाजाचे लोक मानधनावर घेण्यात यावेत व याचा ताबडतोब बंदोबस्त करावा. महापौरांना विनंती आहे की, हा विषय मंजूर करावा व हा विषय इथेच थांबवावा.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मला या विषयावर चर्चा करायची नाही. कारण या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. शिक्षण मंडळ व कुत्री या विषयावर पुन्हा बोलावे लागेल का हे फक्त मला सांगावे. व हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : -१) मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.११४ दि.३१/७/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत शहरातील कुष्ठपिडित अपंग व्यक्तींना दरमहा र.रु.१,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेला मा.महापालिका सभा ठराव क्र.९४४, दि.२३/०७/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

सध्याचे लाभाचे स्वरुप - दरमहा र.रु.१,०००/-, सुधारित लाभाचे स्वरुप - दरमहा र.रु.२,५००/- तसेच जे नवीन अर्जदार या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतील त्यांचे पिंपरी चिंचवड शहरातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे. वरीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सूर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनेअंतर्गत शहरातील कुष्ठपिडीत अपंग व्यक्तींना दरमहा अर्थसहाय्य र.रु.१०००/- ऐवजी सुधारीत लाभाचे स्वरुप दरमहा र.रु.२,०००/- देणेस तसेच जे नविन अर्जदार या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतील त्यांचे पिंपरी चिंचवड शहरातील वास्तव्याचा किमान १५ वर्षांचा पुरावा असावा. अशी दुरुस्ती करणेस या उपसुचनेद्वारे मान्यता देण्यात यावी.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अपंग कल्याणकारी योजने अंतर्गत ५ वर्षापुढील मतिमंदाना देण्यात येणारे अर्थसहाय्य (पेन्शन) रक्कम पूर्वीच्या मंजुर दराने सेरेब्रल पल्सी, सरेब्रल ऑक्टीसिया, क्रॉनिक स्कीझोफ्रेनिया व तत्सम आजार असलेल्या महापालिका हद्दीतील व्यक्तींना देखील सध्याचे योजनेतील मंजुर दराने देण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ७३९ विषय क्रमांक - ९

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.प्रभाकर वाघेरे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव **-**

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.११४ दि.३१/७/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत शहरातील कुष्ठपिडित अपंग व्यक्तींना दरमहा र.रु.१,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेला मा.महापालिका सभा ठराव क्र.९४४, दि.२३/०७/२०१० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

सध्याचे लाभाचे स्वरुप - दरमहा र.रु.१,०००/-, सुधारित लाभाचे स्वरुप - दरमहा र.रु.२,०००/- तसेच जे नवीन अर्जदार या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतील त्यांचे पिंपरी चिंचवड शहरातील वास्तव्याचा किमान १५ वर्षाचा पुरावा असावा वरीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अपंग कल्याणकारी योजने अंतर्गत ५ वर्षापुढील मतिमंदाना देण्यात येणारे अर्थसहाय्य (पेन्शन) रक्कम पूर्वीच्या मंजुर दराने सेरेब्रल पल्सी, सरेब्रल ऑक्टीसिया, क्रॉनिक स्कीझोफ्रेनिया व तत्सम आजार असलेल्या महापालिका हद्दीतील व्यक्तींना देखील सध्याचे योजनेतील मंजुर दराने देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/०४/कावि/२७३/२०१५, दिनांक - ०९/०७/२०१५

२) मा.शहर सुधार समितीकडील ठ.क्र. ५२ दिनांक १५/०७/२०१५

ई प्रभाग समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ०१/०७/२०१५ नुसार प्रभाग क्रमांक ३३ मधील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. प्रभागामध्ये इतरत्र जागा उपलब्ध नसल्यामुळे सर्व्हे नं.२०० मधील आरक्षण क्रमांक ४०७ खेळाचे मैदान मधील सुमारे १५ गुंठे जागा पाण्याच्या टाकीसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - औंध रावेत रस्त्यावर सांगवी फाटा येथे ग्रेड सेपरेटर व फ्लाय ओव्हर बांधणेचे काम चालू आहे. औंध रावेत या ४५ मी. बीआरटीएस रस्त्यापासून सांगवी गावाकडे जाणा-या १८ मी. रुंद रस्त्यास लागून औंध हॉस्पीटलच्या अखत्यारीतील ४०६० अन्वये चौमी इतकी जागा मनपास हस्तांतरीत करणेकामी शासन निर्णय दि.०१ जून २०१५ अन्वये मान्यता दिली. हस्तांतरीत करण्यात येणा-या जागेमध्ये येणारी कर्मचारी वसाहतीची इमारत, प्रवेशव्दार व सिमाभिंत महानगरपालिका नव्याने बांधून देणार आहे. याव्यतिरीक्त शासन निर्णय दि.०१ जून २०१५ नुसार रुग्णालयाच्या आवारात अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी दोन विशेष कक्षासह अतिथीगृहाचे बांधकाम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने करुन घ्यावे असा निर्णय झाला आहे. त्याप्रमाणे त्यांची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.५ कुदळवाडी जाधववाडी येथील पाणीपुरवठा समस्या सोडविणेसाठी या प्रभागाअंतर्गत टाकी बांधणे गरजेचे आहे. तथापी या प्रभागामध्ये ज्याठिकाणी आरक्षण टाकलेल्या जागा त्या जागा उंचावर नसलेमुळे या प्रभागाचे लगत असलेल्या उंचावरील गट क्र. ५३९ येथे पूर्वी टाटा कंपनीने बांधलेल्या कमी उंचीचे टाकीचे लगत जिल्हाधिकारी यांचे अखत्यारीमधील गायरानामधील (गट क्र. ५३९ जाधववाडी) २० गुंठे जागा ताब्यामध्ये घेवून त्याठिकाणी उंच टाकी बांधण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी तसेच पिंपळे सौदागर प्र.क्र. ५५ मधील HCMTR कॉरीडॉर विकासकामासाठी अंदाजपत्रक २०१५-१६ मधील पान क्र.३१ अनु.क्र.५५ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम २५ कोटी इतक्या रकमेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी वाघेरे प्र.क्र.४५ येथे भैरवनाथ मंदिरासमोर सन १९९२ साली छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेत आलेला आहे. सदर ठिकाणचा जुना पुतळा हटवून त्याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनास्थ पुतळा बसविणेत यावा

अशी नागरिकांमधुन मागणी होत आहे तरी सदर ठकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनास्थ पुतळा बसविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ७४० विषय क्रमांक - १०

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.इक्षेका/०४/कावि/२७३/२०१५, दिनांक - ०९/०७/२०१५

२) मा.शहर सुधार समितीकडील ठ.क्र. ५२ दिनांक १५/०७/२०१५

ई प्रभाग समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ०१/०७/२०१५ नुसार प्रभाग क्रमांक ३३ मधील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. प्रभागामध्ये इतरत्र जागा उपलब्ध नसल्यामुळे सर्व्हे नं.२०० मधील आरक्षण क्रमांक ४०७ खेळाचे मैदान मधील सुमारे १५ गुंठे जागा पाण्याच्या टाकीसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच औंध रावेत रस्त्यावर सांगवी फाटा येथे ग्रेड सेपरेटर व फ्लाय ओव्हर बांधणेचे काम चालू आहे. औंध रावेत या ४५ मी. बीआरटीएस रस्त्यापासून सांगवी गावाकडे जाणा-या १८ मी. रुंद रस्त्यास लागून औंध हॉस्पीटलच्या अखत्यारीतील ४०६० अन्वये चौमी इतकी जागा मनपास हस्तांतरीत करणेकामी शासन निर्णय दि.०१ जून २०१५ अन्वये मान्यता दिली. हस्तांतरीत करण्यात येणा-या जागेमध्ये येणारी कर्मचारी वसाहतीची इमारत, प्रवेशव्दार व सिमाभिंत महानगरपालिका नव्याने बांधून देणार आहे. याव्यतिरीक्त शासन निर्णय दि.०१ जून २०१५ नुसार रुग्णालयाच्या आवारात अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी दोन विशेष कक्षासह अतिथीगृहाचे बांधकाम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने करुन घ्यावे असा निर्णय झाला आहे त्याप्रमाणे त्यांची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ५ कुदळवाडी जाधवाडी येथील पाणीपुरवठा समस्या सोडविणेसाठी या प्रभागाअंतर्गत टाकी बांधणे गरजेचे आहे. तथापी या प्रभागामध्ये ज्याठिकाणी आरक्षण टाकलेल्या जागा त्या जागा उंचावर नसलेमुळे या प्रभागाचे लगत असलेल्या उंचावरील गट क्र ५३९ येथे पूर्वी टाटा कंपनीने बांधलेल्या कमी उंचीचे टाकीचे लगत जिल्हाधिकारी यांचे अखत्यारीमधील गायरानामधील (गट क्र. ५३९ जाधववाडी) २० गुंठे जागा ताब्यामध्ये घेवून त्याठिकाणी उंच टाकी बांधण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच पिंपळे सौदागर प्र.क्र. ५५ मधील HCMTR कॉरीडॉर विकासकामासाठी अंदाजपत्रक २०१५-१६ मधील पान क्र.३१ अनु.क्र.५५ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम २५ कोटी इतक्या रकमेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी वाघेरे प्र.क्र.४५ येथे भैरवनाथ मंदिरासमोर सन १९९२ साली छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती

पुतळा बसविणेत आलेला आहे. सदर ठिकाणचा जुना पुतळा हटवून त्याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिहासनास्थ पुतळा बसविणेत यावा अशी नागरिकांमधुन मागणी होत आहे तरी सदर ठकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनास्थ पुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आशा सुर्यवंशी, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधार समितीकडील ठ.क्र.५३ दिनांक १५/०७/२०१५

मौजे रावेत येथील स.नं.९२ ही मिळकत श्रीमती कमळाबाई महादू भोंडवे व इतर ८ जण यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर मिळकत रेल्वेलाईनकडे (गायरानकडे) जाणा-या २४.०० मी.रस्ता, औंध-रावेत ३०.०० मी. रस्ता व म.प्रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित ४५.०० मी.रस्ता या प्रस्तावाने बाधित होत आहे. उपरोक्त स.नं.९२ मधील औंध-रावेत ३०.०० मी. रस्त्याने बाधीत काही क्षेत्राचा भूसंपादन कायद्याने ताबा मिळकतधारकांनी दिलेला आहे. तसेच प्रस्तावित ४५.०० मी. रस्त्याने बाधीत क्षेत्राचा ताबा ही मिळकतधारक मनपास देणेस तयार आहेत. तसेच २४.०० मी. रस्त्यानेही सदर मिळकती मधील ब-याच प्रमाणात क्षेत्र बाधित होत आहे. त्यामुळे एकाच कुटूंबातील क्षेत्र उपरोक्त रस्त्यांच्या आखणीमुळे बाधीत होत आहे. औंध-रावेत बीआरटी रस्त्यापासून रेल्वेलाईनचे दिशेने सुमारे ३००.०० मी. अंतरावर सदर रस्त्यास पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता येऊन मिळत आहे. औंध-रावेत बीआरटी रस्ता ते उपरोक्त पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता या अंतरापर्यंत सदर रस्त्याची रुंदी २४.०० मी.ऐवजी २०.०० मी. केल्यास स.नं.९२ मधील बाधीत क्षेत्र थोडया प्रमाणात कमी होईल व एकाच कुटूंबाचे होणारे नुकसान काही प्रमाणात कमी होईल तरी औंध-रावेत बीआरटी रस्ता ते पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता यामधील अंतरामध्ये उपरोक्त २४.०० मी. रस्त्याची रुंदी पश्चिमेकडील बाजूचे स.नं.९२ मधील कमी करुन २०.०० मी. करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मनपा अंदाजपत्रक सन २०१५/१६ मध्ये पान क्र.८७ अ.क्र.२०६ वर प्रभाग नविन काम अंतर्गत “प्रभाग क्र. १० मध्ये

विविध रस्त्यांची डांबरीकरणाची अत्यावश्यक कामे करणे" या कामासाठी र.रु.२५,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. तथापि अंदाजपत्रकीय र.रु.७,५०,०००/- इतकी नमुद करणेत आली आहे. सदर कामाची निकड लक्षात घेता तसेच सदर कामासाठी उपलब्ध असलेली तरतूद लक्षात घेता सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३७,५०,०००/- यास तसेच सदर कामाची निविदा मुख्यालयातुन काढणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. १८ मधील मामुर्डीसाठी मुंबई पुणे रस्त्यावरील सेंट्रल हॉटेल ते वीरबाबा चौक हा सुमारे ६०० मी लांबीचा व २० फुट रुंदीचा कच्चा रस्ता असून तो देहू रोड कॅन्टोमेंटच्या हद्दीत आहे महानगरपालिका हद्दीतील मामुर्डी भागातील नागरीवस्ती मोठया प्रमाणात असून नागरीकांकडून मोठया प्रमाणावर सदर रस्त्याचा वापर होतो. सदर रस्त्याची दुरुस्ती देहु रोड कँटोमेंट बोर्डाकडुन करणेत येत नाही त्यामुळे सदर रस्ता पिंपरी चिंचवड मनपामार्फत विकसीत करण्यात यावा असे नागरीकांकडुन मागणी होत आहे. सद्दस्थितीत सदर रस्ता कच्चा असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होते. सदर रस्ता मनपातर्फे विकसीत करणेस देहु रोड कॅन्टोन्मेंट बोर्डाची हरकत नाही तरी सदरचा मनपा हद्दीबाहेरील रस्ता मनपा मार्फत विकसित करणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी तसेच प्रभाग क्र.१८ मध्ये विकासनगरजवळ मनपा हद्दीबाहेर देहू रोड कॅन्टोमेंट बोर्डाची स्मशानभूमी आहे. सदर स्मशानभूमीचा मोठया प्रमाणावर वापर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.१८ मधील नागरीकांकडुनच करण्यात येतो सदर स्मशानभूमीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. सदर स्मशानभूमीची दुरुस्ती देहु रोड कॅन्टोमेंट बोर्डाकडुन करणेत येत नाही. सबब सदर स्मशानभूमिची दुरुस्ती पिंपरी चिंचवड मनपा मार्फत करण्यात यावी अशी मागणी नागरीकांकडुन येत आहे. सदर स्मशानभूमीची दुरुस्ती मनपा मार्फत करणेस देहू रोड कँटोमेंट बोर्ड यांची हरकत नाही सदर प्रभाग क्र. १८ लगतची व मनपा हद्दीबाहेरील देहू रोड कँटोमेंट हद्दीतील स्मशानभूमीची किरकोळ दुरुस्ती कामे करणेस व त्यासाठीच्या प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी तसेच प्रभाग क्र.१४ मधील सिध्दीविनायकनगरीसाठी मुंबई पुणे रस्त्यावरील पुनागेट हॉटेल ते सिध्दीविनायकनगरी तसेच ट्रान्सपोर्टनगरी येथील पेट्रोल पंप ते सिध्दीविनायकनगरी हे रस्ते दहु रोड कॅन्टोमेंटच्या हद्दीत आहेत सदर रस्त्याची दुरुस्ती देहु रोड कँटोमेंट बोर्डाकडून करणेत येत नाही त्यामुळे सदर रस्ते पिंपरी चिंचवड मनपामार्फत विकसीत करण्यात यावेत असे नागरीकांकडून मागणी होत आहे. सदर भागातील नागरीवस्ती मोठया प्रमाणात असून नागरीकांकडून मोठया प्रमाणावर सदर रस्त्यांचा वापर होतो. सदर रस्ते कच्चे असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होते सदर रस्ते मनपातर्फे विकसित करणेस देहु रोड कँटोमेंट बोर्डाची हरकत नाही. तरी सदरचे मनपा हद्दीबाहेरील रस्ते मनपामार्फत विकसीत करणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी तसेच मनपा अंदाजपत्रक सन २०१५/१६ मध्ये पान क्र.९६ अ.क्र.५६ वर इमारत योजना (मुख्यालय) या लेखाशिर्षातंर्गत "प्रभाग क्र. १८ आरक्षण क्र.४/१४१ मध्ये बहुउद्देशिय इमारत बांधणे" या

कामासाठी अंदाजपत्रकीय र.रु.७५००००/- इतकी नमुद करणेत आली आहे. सदर जागा मनपाच्या ताब्यात आली असून सदर कामाची निविदा कार्यवाही करणेसाठी सदर कामाचे आरक्षण क्र. ४/१४१ ऐवजी ४/१४७ करणेस तसेच सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु. ७५,००,०००/- करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.** ॲड. **संदीप चिंचवडे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन आहे.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, हा विषय रस्त्याचा आहे आपण या उपसूचना घेवू नये.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ७४१ विषय क्रमांक - ११
दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.आशा सुर्यवंशी, मा.सुमन नेटके यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधार समितीकडील ठ.क्र.५३ दिनांक १५/०७/२०१५

मौजे रावेत येथील स.नं.९२ ही मिळकत श्रीमती कमळाबाई महादू भोंडवे व इतर ८ जण यांचे मालकी वहीवाटीची आहे. सदर मिळकत रेल्वेलाईनकडे (गायरानकडे) जाणा-या २४.०० मी.रस्ता,औंध-रावेत ३०.०० मी. रस्ता व म.प्रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित ४५.०० मी.रस्ता या प्रस्तावाने बाधित होत आहे. उपरोक्त स.नं.९२ मधील औंध-रावेत ३०.०० मी. रस्त्याने बाधीत काही क्षेत्राचा भूसंपादन कायद्याने ताबा मिळकतधारकांनी दिलेला आहे. तसेच प्रस्तावित ४५.०० मी. रस्त्याने बाधीत क्षेत्राचा ताबा ही मिळकतधारक मनपास देणेस तयार आहेत. तसेच २४.०० मी. रस्त्यानेही सदर मिळकती मधील ब-याच प्रमाणात क्षेत्र बाधित होत आहे. त्यामुळे एकाच कुटूंबातील क्षेत्र उपरोक्त रस्त्यांच्या आखणीमुळे बाधीत होत आहे. औंध-रावेत बीआरटी रस्त्यापासून रेल्वेलाईनचे दिशेने सुमारे ३००.०० मी. अंतरावर सदर रस्त्यास पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता येऊन मिळत आहे. औंध-रावेत बीआरटी रस्ता ते उपरोक्त पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता या अंतरापर्यंत सदर रस्त्याची रुंदी २४.०० मी.ऐवजी २०.०० मी. केल्यास स.नं.९२ मधील बाधीत क्षेत्र थोडया प्रमाणात कमी होईल व एकाच कुटूंबाचे होणारे नुकसान काही प्रमाणात कमी होईल तरी औंध-रावेत बीआरटी रस्ता ते पुर्व-पश्चिम १८.०० मी. रस्ता यामधील अंतरामध्ये उपरोक्त २४.०० मी. रस्त्याची रुंदी पश्चिमेकडील बाजूचे स.नं.९२ मधील कमी करुन २०.०० मी. करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा अंदाजपत्रक सन २०१५/१६ मध्ये पान क्र.८७ अ.क्र.२०६ वर प्रभाग नविन काम अंतर्गत “प्रभाग क्र. १० मध्ये विविध रस्त्यांची डांबरीकरणाची अत्यावश्यक कामे करणे” या कामासाठी र.रु.२५,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. तथापि अंदाजपत्रकीय र.रु. ७,५०,०००/- इतकी नमुद करणेत आली आहे. सदर कामाची निकड लक्षात घेता तसेच सदर

कामासाठी उपलब्ध असलेली तरतूद लक्षात घेता सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु.३७,५०,०००/- यास तसेच सदर कामाची निविदा मुख्यालयातुन काढणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. १८ मधील मामुर्डीसाठी मुंबई पुणे रस्त्यावरील सेंट्रल हॉटेल ते वीरबाबा चौक हा सुमारे ६०० मी लांबीचा व २० फुट रुंदीचा कच्चा रस्ता असून तो देहू रोड कॅन्टोमेंटच्या हद्दीत आहे. महानगरपालिका हद्दीतील मामुर्डी भागातील नागरीवस्ती मोठया प्रमाणात असून नागरीकांकडून मोठया प्रमाणावर सदर रस्त्याचा वापर होतो. सदर रस्त्याची दुरुस्ती देहु रोड कँटोमेंट बोर्डाकडुन करणेत येत नाही त्यामुळे सदर रस्ता पिंपरी चिंचवड मनपामार्फत विकसीत करण्यात यावा असे नागरीकांकडुन मागणी होत आहे. सद्दस्थितीत सदर रस्ता कच्चा असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होते. सदर रस्ता मनपातर्फे विकसीत करणेस देहु रोड कॅन्टोन्मेंट बोर्डाची हरकत नाही तरी सदरचा मनपा हद्दीबाहेरील रस्ता मनपा मार्फत विकसित करणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे तसेच प्रभाग क्र. १८ मध्ये विकासनगरजवळ मनपा हद्दीबाहेर देहू रोड कॅन्टोमेंट बोर्डाची स्मशानभूमी आहे. सदर स्मशानभूमीचा मोठया प्रमाणावर वापर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १८ मधील नागरीकांकडुनच करण्यात येतो सदर स्मशानभूमीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. सदर स्मशानभूमीची दुरुस्ती देहु रोड कॅन्टोमेंट बोर्डाकडुन करणेत येत नाही सबब सदर स्मशानभूमिची दुरुस्ती पिंपरी चिंचवड मनपा मार्फत करण्यात यावी अशी मागणी नागरीकांकडुन येत आहे. सदर स्मशानभूमीची दुरुस्ती मनपा मार्फत करणेस देहू रोड कँटोमेंट बोर्ड यांची हरकत नाही. सदर प्रभाग क्र.१८ लगतची व मनपा हद्दीबाहेरील देहू रोड कँटोमेंट हद्दीतील स्मशानभूमीची किरकोळ दुरुस्ती कामे करणेस व त्यासाठीच्या प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र.१४ मधील सिध्दीविनायकनगरीसाठी मुंबई पुणे रस्त्यावरील पुनागेट हॉटेल ते सिध्दीविनायकनगरी तसेच ट्रान्सपोर्टनगरी येथील पेट्रोल पंप ते सिध्दीविनायकनगरी हे रस्ते देहु रोड कॅन्टोमेंटच्या हद्दीत आहेत सदर रस्त्याची दुरुस्ती देहु रोड कँटोमेंट बोर्डाकडून करणेत येत नाही त्यामुळे सदर रस्ते पिंपरी चिंचवड मनपामार्फत विकसीत करण्यात यावेत असे नागरीकांकडून मागणी होत आहे. सदर भागातील नागरीवस्ती मोठया प्रमाणात असून नागरीकांकडून मोठया प्रमाणावर सदर रस्त्यांचा वापर होतो. सदर रस्ते कच्चे असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होते सदर रस्ते मनपातर्फे विकसित करणेस देहु रोड कँटोमेंट बोर्डाची हरकत नाही. तरी सदरचे मनपा हद्दीबाहेरील रस्ते मनपामार्फत विकसीत करणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपा अंदाजपत्रक सन २०१५/१६ मध्ये पान क्र.९६ अ.क्र.५६ वर इमारत योजना (मुख्यालय) या लेखाशिर्षातंर्गत “प्रभाग क्र. १८ आरक्षण क्र.४/१४१ मध्ये बहुउद्देशिय इमारत बांधणे” या कामासाठी अंदाजपत्रकीय र.रु.७५००००/- इतकी नमुद करणेत आली आहे. सदर जागा मनपाच्या ताब्यात आली असून सदर कामाची निविदा कार्यवाही करणेसाठी सदर कामाचे आरक्षण क्र. ४/१४१

ऐवजी ४/१४७ करणेस तसेच सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय र.रु. ७५,००,०००/- करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७४२ विषय क्रमांक - १२

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.गोरक्ष लोखंडे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधार समितीकडील ठ.क्र. ५८ दिनांक ३१/०७/२०१५

पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या व वाढते शहरीकरण तसेच शहरामधील अनेक हॉस्पिटल्स व रुग्णाकरीता रक्ताची व रक्तघटकाची गरज लक्षात घेता रुग्णांना रक्ताची गरज भासल्यास खाजगी रक्तपेढी अथवा पुण्यामध्ये जावे लागते. त्यामुळे बहुसंख्य नागरिकांच्या मागणीस अनुसरुन पिंपरी चिंचवड शहरामध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून किमान दोन तरी रक्तपेढया आवश्यक आहेत. १९९१ साली सुरु केलेली तालेरा रुग्णालयातील क्रांतीवीर चापेकर बंधू रक्तपेढी ही पुन्हा कार्यान्वीत करावी व नव्याने सुरु झालेली वाय.सी.एम.रुग्णालयातील रक्तपेढी गोरगरीब रुग्णांसाठी सुरु रहावी. अशा प्रकारे क्रांतीवीर चापेकर बंधू रक्तपेढी तालेरा हॉस्पिटल चिंचवड येथे व यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय, संत तुकारामनगर येथे अशा दोन ठिकाणी रक्तपेढी कार्यान्वीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आपल्याला माहित आहे पूर्वी तालेरा हॉस्पिटल इथे रक्तपेढी होती ती वायसीएमला शिफ्ट केली आहे. सर्वांची मागणी आहे की, तालेरा हॉस्पिटल इथे सुद्धा रक्तपेढी सुरु ठेवा. तालेरा हॉस्पिटल इथे काय अडचण आहे का.

**डॉ.रॉय (आरोग्य वैद्यकीय अधिकारी)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,तालेरा हॉस्पिटलमध्ये १९९१ पासून चापेकर बंधू ब्लड बँक चालू होती आपण २०१३-२०१४ मध्ये ८७% साठा हा तालेरातील रक्तपेढीमध्ये कलेक्शन केला. तो सगळा साठा वायसीएममध्ये वापरला गेला. रक्तपेढी सुरु करण्यासाठी एफ.डी.आय.ची परवानगी लागते. रक्तपेढी ट्रान्सफर करताना एफ.डी.आय.ची परवानगी घेऊनच ती ट्रान्सफर केली आहे. नवीन सेवा उपलब्ध झाल्यानंतर तालेरा हॉस्पिटल इथे रक्तपेढी सुरु करु. तालेरामध्ये ब्लड स्टोअरेज यंत्रणा असून एक वर्षाने ती सुरु करु शकतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१५/ २०१५ दि.१५/४/२०१५

२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/ २०१५ दि.१५/४/२०१५

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. ६८५ दि.१३/५/२०१५

४) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७०३ दि.२०/६/२०१५

५) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२५ दि.२३/७/२०१५

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे सद्यस्थितीत १४५० बसेस व भाडेतत्वावरील ६६२ बसेस अशा मिळून एकूण २११२ बसेस आहेत. यासाठी महामंडळाकडे पुणे हद्दीत ७ डेपो व पिंपरी चिंचवड हद्दीत ३ डेपो असे+मिळून एकूण १० डेपो आहेत. बस संख्येच्या प्रमाणात जागा उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत महामंडळाच्या शेकडो बसेसचे पार्किंग रस्त्यावर करण्यात येते. भविष्यामध्ये जे.एन.यु.आर.एम. अंतर्गत ५०० नविन बसेस परिवहन महामंडळास प्राप्त होणार आहेत. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व बसेसचे पार्किंग संरक्षित जागेत होणे आवश्यक आहे. तरी सदर बसेसचे अंतर्गत पार्कींग व देखभाल दुरुस्तीसाठी महामंडळास जागेची अत्यंत आवश्यकता आहे व त्यासाठी मनपा हद्दीतील रिकाम्या झालेल्या विविध जकात नाक्यांच्या जागा बस डेपो/बसस्थानकाचे वापरासाठी मिळणेस परिवहन महामंडळाने विनंती केलेली आहे व अशा १० जकात नाक्यांच्या जागेंची यादी त्यांनी दिलेली आहे.

तथापी यापूर्वी मनपा हद्दीतील बस टर्मिनससाठी आरक्षित असलेल्या एकूण ४ जागा आदेश क्रं.भूजि/सर्व्हे-२/कावि/१७०/१४ दि.३/२/१४ अन्वये परिवहन महामंडळास सदर जागांची असणारी तातडी लक्षात घेता तात्पुरत्या स्वरुपात देणेत आल्या आहेत.

पि.चि.म.न.पा. हद्दीतील एकूण १० जकात नाक्यांच्या संपूर्ण जागा ताब्यात मिळणेबाबत परिवहन महामंडळाने विनंती केली आहे. सदर जकात नाक्यांचे जागांचा ताबा दि. ८/४/१५ रोजी एल.बी.टी. (जकात) विभागाकडून या विभागांस प्राप्त झाला आहे. सदर मागणी केलेल्या १० जकात नाक्यापैकी एकूण ३ जागा परिवहन महामंडळास देता येणे शक्य आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.क्रं. | गावाचे/जकात नाक्याचे नाव | प्रयोजन | स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | निगडी | | से.क्रं.२२ | १.०० | प्राधिकरणाकडून ताबा |
| २ | च-होली | | ९९३ पै. | ०.४३ | T.D..R. ने ताबा |
| ३ | डुडुळगाव | | ५० पै. | ०.४० | ताबा आहे. |
| | | | एकूण क्षेत्र | १.८३ हे. | |

सदर जागा परिवहन महामंडळास देणेबाबतची तातडी पाहता, सद्यस्थितीत उपरोक्त नमूद केलेप्रमाणे मनपाच्या एकूण ३ जकात नाक्यांच्या जागा कायदा, नगररचना विभाग यांचे अभिप्राय/अटी-शर्तीस अधिन राहून पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांस बसडेपो/बसस्थानकाचे वापरासाठी तात्पुरत्या स्वरुपात देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ तीन महिने तहकूब करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७४३ विषय क्रमांक - १३
दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१५/ २०१५ दि.१५/४/२०१५
२) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/ २०१५ दि.१५/४/२०१५
३) मा.महापालिका सभा ठराव क्र. ६८५ दि.१३/५/२०१५
४) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७०३ दि.२०/६/२०१५
५) मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२५ दि.२३/७/२०१५

विषय क्रमांक १३ चा विचार माहे डिसेंबर २०१५ चे सभेमध्ये करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७४४ विषय क्रमांक - १४
दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा. विधी समिती**

अ) दि.५/१२/२०१४ व दि.१९/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
आ) दि.१९/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
इ) दि.२/१/२०१५, १६/१/२०१५, ६/२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ई) दि. १६/१/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
उ) दि. ३१/१/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ऊ) दि.६/२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ए) दि.२०/२/२०१५, दि.३/३/२०१५ (स.१०.४५ व दु.२.०० ), दि.२०/३/२०१५, दि.२६/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ऐ) दि.२०/३/२०१५, दि.२६/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ओ) दि.४/४/२०१५, दि.१७/४/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
औ) दि.२/५/२०१५, दि५/५/२०१५, दि.१५/५/२०१५, दि५/६/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
अं) दि.५/६/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.१९/६/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ख) दि.१७/७/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७४५ विषय क्रमांक - १५
दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

दि. २४/६/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७४६ विषय क्रमांक - १६

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

दि.२०/५/२०१५ (दु.३.०० व ४.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७४७ विषय क्रमांक - १७

दिनांक - २५/८/२०१५ विभाग - मा.नगरसचिव

**मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दि. २०/५/२०१५ व दि. २१/५/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

आ) दि. ३/६/२०१५ व दि. ५/६/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/३१६/१५
दिनांक - १९/१०/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**( विषय पत्र क्र.क्रीडा/०८/कावि/४५/२०१५ दिनांक - २५/०५/२०१५ मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक १०९, दिनांक - १५/०७/२०१५ व मा.महापालिका सभा ठ.क्र.७३२ दि.२५/८/२०१५ चे लगत )**

**प्रपत्र अ**

१) **क्रीडा धोरणामध्ये, आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे या मध्ये** म.न.पा. परिसरातील जे खेळाडू एशियन, राष्ट्रकुल, कॉमनवेल्थ ऑलिपिंक अशा नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतात. अशा खेळाडूंना प्रवास खर्चासाठी विमान भाड्याच्या ५०% किंवा किट चार्जेस, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. करीता कमाल रू.२०,०००/- देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये बदल करून खेळाडूंना प्रवासखर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रू.१,००,०००/- अर्थसहाय्य देण्यात येते .त्यानुसार म.न.पा.परिसरातील नागरिक, क्रीडा प्रेमी व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता र.रु.१,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा केले जाईल. निमंत्रित स्पर्धेसाठी जाणा-या आंतरराष्ट्रीय खेळाडूसाठी सदर आर्थिक सहाय्य देय राहणार नाही. महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार अथवा पिंपरी चिंचवड म.न.पा. यापैकी एकाच प्राधिकृत संस्थेकडून स्पर्धा प्रवास, निवास, भोजन खर्च देय राहिल. तसे लेखी पत्र संबंधित राज्य, राष्ट्रीय क्रीडा संघटनेकडून देणे बंधनकारक राहिल.असे नमूद आहे. त्यानुसार म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी ,कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा केले जाईल.

२) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता निवड झाल्याचे इंडिअन माउंटेनिअरिंग फौंडेशन, यांचे पत्र असणे आवश्यक आहे.

३) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य साठी विहित नमुन्यात अर्ज सदर करताना अर्जासोबत पास पोर्ट, बँक पासबुक, स्वतःचे पॅन कार्ड ई.च्या झेरॉक्स सत्यप्रत करून जोडणे आवश्यक आहे.

४) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक यांनाच गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक साहाय्य केले जाईल .याकामी अर्जदार हे पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीतील किमान ५ वर्षे रहिवासी असणे आवश्यक आहे. याबाबत अर्ज सोबत वास्तव्याचे (आधारकाड़, रेशन कार्ड) पुरावे सादर करणे आवश्यक आहे.

५) म.न.पा.अधिकारी अथवा कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक साहाय्य केले जाईल .याकामी अर्जदार यांनी पिंपरी चिंचवड म.न.पा. ची सलग ५ वर्षे सेवा पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे.याबाबत संबंधित कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. उदा.म.न.पा.सेवेत नियुक्तीचे आदेश ,शाखाप्रमुखाची शिफारस, आधारकाड़, रेशन कार्ड इ.

६) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता ५ वर्षातून एकदाच आर्थिक सहाय्य केले जाईल .

७) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता अर्जदारांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

८) म.न.पा.परिसरातील नागरिक, क्रीडा प्रेमी व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता किमान ३० दिवस अगोदर विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

९) अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही. फसवणूक करून आर्थिक सहाय्य घेतल्यास कायदेशिर कारवाई करून वसूल केली जाईल

१०) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य घेणेपुर्वी संबंधित खेळाडूने र.रू.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमून्यात करारनामा करून द्यावा लागेल.

११) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य घेतल्यानंतर मोहिमेहू न आल्यानंतर दिलेल्या आर्थिक सहाय्याचा विनियोग दाखला ,त्याबाबतची मूळ बिले सादर करणे आवश्यक राहील.

१२) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता सदर आर्थिक सहाय्याचा लाभ भारत सरकार,महाराष्ट्र शासन अथवा महानगरपालिका एका संस्थेकडूनच घेता येईल याबाबत लेखी हमी पत्र द्यावे लागेल.

१३) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता जाणे पूर्वी अथवा जाऊन आल्यानंतर एकदाच आर्थिक साहाय्य अदा केले जाईल.

१४) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य बाबत अर्ज करताना त्यांनी यापूर्वी पूर्ण केलेल्या गिर्यारोहण मोहिमेची आवश्यक ती कागदपत्रे प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१५) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता स्वतःच्या जबाबदारीवर जावे लागेल.मोहिमेवर जाताना अथवा येताना काही नैसर्गिक आपत्ती आल्यास, भूकंप, दरड कोसळणे, पूर प्रलय आल्यास, जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

१६) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमे करिता आवश्यक तो पत्र व्यवहार, याकामी लागणारी कागद पत्रे यांची पूर्तता संबंधित गिर्यारोहक यांनी वेळेत करणे आवश्यक आहे.

सही/-

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४१११०१८